दैनिक
जनप्रभात
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
मुख्य संपादक :- राहुल गजरे
कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

सावकाराला जाजाला कंटाळून शेतकऱ्याने केली आत्महत्या.

समुद्रपूर/ अमोल झाडे

तालुक्यातील खंडाळा येथील शेतकरी मृत्यक रवींद्र दादाजी झाडे यांचा कडे ३ एकर शेती असून ते शेती आई बेबी दादाजी झाडे यांचा नावे होती आईला १ रोगाने ग्रासाले असताना पैसे नव्हते म्हणून त्या शेतकऱ्याने एका सावकाराकडून २ लाख व्याजाने घेतले होते त्याने शेती आपल्या नावाने करून घेतली जेव्हा आणि जवळपास १० वर्ष अंदाजे झाले... जेव्हा मृत्यक हा त्या सावकाराला पैसे वापस देण्या साठी जेव्हा जेव्हा गेला तेव्हा पैसे दिले मग तो सावकार हा आपण ३ महिन्याने करू २ महिन्याने करू तारीख देऊ देऊ शेतकऱ्याला आज पर्यंत गुलवत ठेवले मृत्यक शेतकऱ्याची आई वयरद्ध आहे त्या मुळे शेतकरी रोज सावकाराला फोन करतो त्याची भेट गेत होता पन ३ महिन्या अगोदर त्या सावकाराने ते शेती दुसऱ्याचा नावाने करून दिली जेव्हा हा मृत्यक शेतकऱ्याला माहित झाले कि आपली शेती दुसऱ्याचा नावे करून दिली तेव्हा तो त्या सावकाराला भेटला तेव्हा त्यांनी सांगितले २५ ते ३० लाख घेऊन ये आणि तुझे शेत वापस घेऊन जा असं त्या सावकाराने मृत्यक रवींद्र दा झाडे याला सांगितले तेव्हा पासून तो मानसिक तसुलन बिघडून त्याने आत्महत्या केली असं त्याचा चुलत भाऊ आणि गावकारी सांगत आहे त्याने अनेक गावकऱ्यांना सांगितलं हा माझा शेत देत नाही पैसे घेऊन असे सांगण्यात आले होते.

*(आष्टी) वर्धा *सोमवार, २७ जुलै २०२६ *वर्ष ४ थे *अंक १९४ *पृष्ठ ६ *मुल्य ५.०० RNI No.: MAHAR/2022/82242

पैशांअभावी शस्त्रक्रिया थांबणार नाही- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

गंभीर आजारांवरील उपचारांसाठी निधी; हजारो रुग्णांनी घेतला 'महाआरोग्य शिबिरा'चा लाभ

नागपूर : आजार कितीही गंभीर आणि मोठा असला तरी केवळ पैसे नाही म्हणून गरिबांचे उपचार थांबू नये, यासाठी राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध केला आहे. येथे आयोजित महाआरोग्य शिबिर हे गरीब रुग्णांसाठी एक वरदान असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे धनवटे नॅशनल कॉलेजच्या प्रांगणात आयोजित महाआरोग्य शिबिरात आज मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार अजित गोपछडे, आमदार सर्वश्री प्रवीण दटके, संजय भेडे, मोहन मते, राजीव पोतदार, महापौर नीता ठाकरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

समाजातील शेवटच्या घटकाला आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्या हाच या शिबिराचा उद्देश असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वांना आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय राज्य शासनाने घेतले. रुग्णालयांची संख्या वाढवली. राज्य सरकाराच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेत वापूर्वी जे गंभीर आजार नव्हते, ते समाविष्ट केले. गेल्या दीड वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे ५७ हजार रुग्णांना ४५२ कोटी रुपये उपचारांसाठी उपलब्ध करून दिले. सर्व धर्मादाय रुग्णालयातील खाटा गरीब रुग्णांसाठी राखीव असल्या पाहिजे, यासाठी डिजिटल पद्धती निर्माण केली. जवळपास १० आजार असे आहेत की जे योजनेच्या ५ लाख रुपयांच्या मर्यादित बसू शकत नाही, त्यामुळे त्यासाठी ९ लाखांपर्यंत, तर काही आजारांच्या बाबतीत ३५ लाख रुपयांपर्यंत मदत करण्याचे शासनाचे धोरण असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

ऐकू न आल्यामुळे बोलता न येणाऱ्या मुलांची समस्या लक्षात घेता लहान मुलांसाठी कॉक्लीयर इम्प्लांट शस्त्रक्रिया निःशुल्क सुरु केल्या. त्यामुळे ही मुले ऐकू शकतील व बोलूही शकतील. पुढच्या पिढीत कोणीही मूक- बधिर असणार नाही, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. दिव्यांग बांधवांना वेत्या ९ ऑगस्ट रोजी कृत्रिम पाय, हातांचे वितरण केले जाणार आहे. सेवा हाच आमचा धर्म आहे. त्यामुळे गरिबातल्या गरीब माणसाला मदत करून समाज निरोगी होण्याच्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून गोरगरीबांची सेवा होत असल्याची भावना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. कॅन्सरवरील काही कॅप्सूल, इंजेक्शन यांचा खर्च प्रचंड आहे. तो कमी करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने प्रयत्न करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रारंभी माजी आमदार संदीप जोशी यांनी प्रास्ताविकात या शिबिरामागची भूमिका सांगितली. १५ ते २२ जुलै या काळात शहरात विविध ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये ३१ हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील साडे चार हजार रुग्णांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती जोशी यांनी यावेळी दिली.

तत्पूर्वी, फिरता दवाखाना, रुग्णवाहिका यांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यानंतर दिव्यांग बांधवांना त्यांच्या हस्ते व्हीलचेअरचे वितरण करण्यात आले.

अनेक संस्थांतर्फे यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तसेच गंगाधरराव फडणवीस स्मृती डायग्नोस्टिक सेंटरल्या देणगी आणि रुग्णवाहिका प्रदान करण्यात आली. हे सर्व दाते तसेच महाशिबिराच्या आयोजनात सहभागी डॉक्टरांचा सत्कार यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. शिबिराचे सहसंयोजक नगरसेवक रितेश गावंडे यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

दरम्यान या महाआरोग्य शिबिरात हृदयरोग, त्वचा, कर्करोग, आकस्मिक विभाग, नेत्र, ईएनटी, वासह अनेक आजारांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत करण्यात आली. नागपूर शहर तसेच जिल्ह्यातून आलेल्या हजारो रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला. या रुग्णांना औषधे निःशुल्क देण्यात आली तसेच त्यांच्या विविध चाचण्या आणि शस्त्रक्रियांसह अन्य उपचारांची व्यवस्थाही आयोजकांतर्फे निःशुल्क करण्यात आली.

वर्धा येथील शिबिरात ३ दिवसांत ६६०८ नागरिकांची आरोग्य तपासणी

आरोग्य अमृत महोत्सव महाआरोग्य शिबिर, ४१८६ जणांची घेतला नेत्र तपासणीचा लाभ, पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांची संकल्पना

वर्धा (जिमाका) : पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत जिल्ह्यातील पहिले महाआरोग्य शिबिर वर्धा येथे पार पडले. या शिबिरात ६ हजार ६०८ नागरिकांची विविध आजाराची तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे तीन दिवसांच्या शिबिरात ४ हजार १८६ नागरिकांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला.



पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून गेल्यावर्षी मोतीबिंदू विरहित वर्धा अभियान राबविण्यात आले. यावर्षी आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत चार ठिकाणी महाआरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. आजारांवर फार मोठ्या प्रमाणावर खर्च होतो, सर्वसामान्य नागरिक हा खर्च भागवू शकत नाही, तसेच नागरिकांना विविध आजार तपासणीची विनामूल्य सुविधा व पुढील उपचार उपलब्ध करून देण्यासाठी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवांतर्गत वर्धा येथे आयोजित शिबिरात तिन्ही दिवस नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तिन दिवसात विविध आजारांची एकूण ६ हजार ६०८ नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्यात ३०८७ पुरुष व ३५२१ महिलांचा समावेश आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांनी अधिक सहभाग नोंदवला. तपासणीमध्ये ४१८६ नागरिकांची नेत्र तपासणी, ३५४ रुग्णांचे दंत तपासणी, ५९६ रुग्णांचे नाक, कान, घसा तपासणी, ३२५ रुग्णांची त्वचारोग तपासणी, १३२ महिलांची स्त्रीरोग तपासणी, ६३८ रुग्णांची हाडरोग तपासणी, ९२ रुग्णांची शल्यक्रिया तपासणी करण्यात आली.शिबिरात ४२२५ औषधवैद्यक तपासणी, १०४७ रुग्णांची असंसर्गजन्य आजार तपासणी, १९७ रुग्णांची मानसोपचार तपासणी, ७ महिला रुग्णांची स्तन कॅन्सर तपासणी, ३०१ रुग्णांची हेमोफॅगोसाइटिक लिम्फोहिस्टिओसाइटोसिस (एच) तपासणी, ३९४ रुग्णांची ईसीजी तपासणी करण्यात आली. शिबिरच्या तपासणीमध्ये ५८ रुग्णांमध्ये हृदयरोग आढळला तर मधुमेह, रक्तदाबाचे १०६ तर कर्करोगाचे २२ संशयित रुग्ण आढळून आले. शिबिरात ३८१७ रुग्णांना औषधे वितरण तर ३२६१ नागरिकांना चष्म्यांचे वितरण करण्यात आले. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ३४५ नागरिकांचे आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड काढण्यात आले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाद्वारे ६६ रुग्णांचे विविध वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदतीचे अर्ज भरुन घेण्यात आले. १९९ अपंग बांधवांकडून त्यांना आवश्यक साहित्यासाठी मोजमाप शिबिरात करण्यात आले. पहिल्याच शिबिरास प्रचंड प्रतिसाद मिळाला.

नागरिकांनी पुढील ३ शिबिरांचा लाभ घ्यावे : पालकमंत्री

आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत पुढील महा आरोग्य शिबिर तळेगाव (शामजीपंत) येथे दिनांक ८ व ९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले आहे. हिंगणघाट येथे १० व ११ ऑगस्ट रोजी तर देवळी येथे १३ व १४ ऑगस्ट रोजी शिबिर होणार आहे. या शिबिरांचा देखील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले आहे.

एकीकडे समायोजन, दुसरीकडे आठ महिन्यांपासून वेतनाची प्रतीक्षा; जलजीवन-स्वच्छता मिशनचे १,१३६ कर्मचारी आंदोलनात

आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाला गती; जलजीवन व स्वच्छ भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांवर अन्याय

वर्धा : केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत असलेल्या १ हजार १३६ कंत्राटी कर्मचाऱ्यांना गेल्या आठ महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याने त्यांच्यावर गंभीर आर्थिक संकट ओढवले आहे. थकीत वेतन तातडीने अदा करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी दिनांक २३ जुलै २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले असून, वर्धा जिल्हा परिषदेतही कर्मचाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांना निवेदन दिले आहे.



या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कंत्राटी कर्मचाऱ्यांबाबत दोन परस्परविरोधी चित्रे समोर आली आहेत. एकीकडे आरोग्य व शिक्षण विभागातील १० ते १५ वर्षांपासून कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाची प्रक्रिया वेगाने सुरू असून त्यांना कायम सेवेचे संरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होत आहे, तर दुसरीकडे जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना आठ महिन्यांपासून वेतनच मिळालेले नाही, शिवाय त्यांच्या समायोजनाबाबत कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

विशेष म्हणजे, जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत अनेक कर्मचारी गेल्या २०१२ २२ वर्षांपासून सातत्याने सेवा बजावत आहेत. उच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (मॅट) यांनी १० वर्षे पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समायोजनाबाबत सकारात्मक आदेश दिलेले असतानाही या विभागातील कर्मचाऱ्यांना समायोजनापासून वंचित ठेवण्यात येत असल्याचा आरोप कर्मचारी संघटनांनी केला आहे. उलट, राज्य शासनाकडून या कर्मचाऱ्यांनी नेमके कोणते काम केले, त्यांची आवश्यकता आहे का, त्यांचे काम समाधानकारक आहे की नाही, यासंदर्भातील माहिती मागविण्यात आली आहे.

दोन दशकांहून अधिक काळ राज्यातील स्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त अधिक गावांची निर्मिती, हर घर नल हे जल, घनकचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्त उपक्रम, शाश्वतच्छता, जनजागृती, वर्तन परिवर्तन, पाणीपुरवठा व स्वच्छता व्यवस्थापन यासारखी अहोरात्र काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच आज स्वतःच्या अस्तित्वाबद्दल प्रश्न निर्माण झाला आहे, अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. दरम्हा निर्धारितपणे शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवूनही वेतनासाठी महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. परभाडे, मुलांचे शिक्षण, बँक कर्जाचे हप्ते, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला असून अनेक कर्मचाऱ्यांना कर्ज काढून संसाराचा गाडा चालवावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, गेल्या आठ महिन्यांतील थकीत वेतनाबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आतापर्यंत ३० ते ३५ निवेदने व पत्रे संबंधित विभाग, वरिष्ठ अधिकारी आणि शासनाकडे सादर करण्यात आली आहेत. याशिवाय मंत्रालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊनही वेतनाच्या प्रश्नतातडीने सोडविण्याची मागणी करण्यात आली. मात्र, बारंबार पाठपुरावा, निवेदने आणि प्रत्यक्ष चर्चेनंतरही वेतनाचा प्रश्न मार्गी लागलेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

कर्मचारी संघटनांनी राज्य शासनावर नाराजी व्यक्त करताना, शासन आम्च्याकडून नियमित काम करून घेत असताना वेळेवर वेतन देण्याची जबाबदारीही शासनाचीच असल्याचे स्पष्ट केले. कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित दिले जात असताना कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मात्र निधीअभावी वेतन रोखले जात असल्याचा आरोपही करण्यात आला. विशेष म्हणजे, जलजीवन मिशनच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचीनिधी राज्यस्तरावर उपलब्ध असल्याचीही माहिती आहे, तर स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आवश्यक निधी पाचसाठी अधिवेशनातील पुरवणी मागणीत मंजूर करण्यात आला आहे. असे असूनही संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन अद्याप वितरित झाले नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे.

कारंजात चायनीजच्या गाड्यांवर घातक फुड कलर्सचा सर्रास वापर

- नागरिकांच्या आरोग्याशी खेळ ; प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी

कारंजा (घाडगे) : शहरातील विविध भागात लागणाऱ्या चायनीज खाद्यपदार्थांच्या हातगाड्यांवर मानवी आरोग्यास अत्यंत घातक असलेले आणि प्रशासनाकडून बंदी घालण्यात आलेले फूड कलर तसेच इतर हानिकारक साहित्यांचा वापर केला जात असल्याचे संगण्यात येते. आकर्षक रंग आणि चव आणण्यासाठी केला जाणारा हा प्रकार थेट नागरिकांच्या आणि लहान मुलांच्या आरोग्याशी खेळणारा ठरत आहे.

कारंजा शहरात गल्लीबोळांत आणि मुख्य रस्त्यांवर चायनीज खाद्यपदार्थांचे ठेले मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. सायंकाळच्या वेळी या ठेल्यांवर तरुणाईसह लहान मुलांची मोठी गर्दी दिसून येते. मात्र, शेजवान राईस, मंच्युरियन, नूडल्स यासारख्या पदार्थांना आकर्षक रंग आणण्यासाठी चालकांकडून रासायनिक आणि बंदी घातलेल्या फूड कलरचा बेधडक वापर सुरू आहे.

याशिवाय, चव वाढवण्यासाठी अमानक दर्जाचे अजिनोमोटो निकृष्ट दर्जाचे तेल आणि इतर रासायनिक सॉस वापरले जात असल्याचे समोर आले आहे. असे अन्नपदार्थ नियमित खाल्ल्याने पोटविकार, ॲलर्जी तसेच मूत्रपिंडाचे गंभीर आजार होण्याचा धोका आरोग्य तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. याकडे अन्न व औषध प्रशासनाचे या अवैध प्रकाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहेत. नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा चायनीज ठेले चालकांवर अन्न व औषध प्रशासनाने आणि स्थानिक नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ संयुक्त कारवाई करावी, अशी मागणी कारंजा शहरातील नागरिकांनी केली आहे.

'मन की बात' मध्ये आर्वी विधानसभा पुन्हा एकदा महाराष्ट्रात अव्वल; वर्धा जिल्ह्यातील चार विधानसभेचा दबदबा!

आमदार सुमित वानखेडे यांच्या कुशल नेतृत्वाचा वर्धा जिल्ह्यावर प्रभाव; भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

प्रतिनिधी/ दै.जनप्रभात

आर्वी : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १३६ व्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या बूथस्तरीय आयोजनामध्ये आर्वी विधानसभा मतदारसंघाने सलग पाचव्यांदा संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावून एक नवा इतिहास रचला आहे. आमदार सुमित वानखेडे यांच्या अभूतपूर्व आणि कुशल नेतृत्वाखाली आर्वी विधानसभेने 'नेहमी प्रथम राहण्याची' शिस्त आणि परंपरा कायम टेवली आहे. विशेष म्हणजे आर्वीच्या या यशाचा सकारात्मक प्रभाव वर्धा जिल्ह्यातील इतर विधानसभा मतदारसंघांवरही दिसून आला असून राज्यातील पहिल्या चार क्रमांकांमध्ये वर्धा जिल्ह्यातील तब्बल तीन विधानसभा मतदारसंघांनी बाजी मारली आहे. यामुळे संपूर्ण वर्धा जिल्हा भाजपमध्ये उत्साहाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.





प्रसिद्ध झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, आर्वी विधानसभा मतदारसंघातील सर्व ३१० बूथवर (१०० कव्हरेज) 'मन की बात' कार्यक्रमाचे अत्यंत नियोजनबद्ध व यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात तब्बल ५,६०५ नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पंतप्रधान मोदींचे विचार ऐकले. आमदार सुमित वानखेडे यांनी आखून दिलेली रणनीती, कार्यकर्त्यांशी असलेल्या थेट संवाद आणि उत्कृष्ट मायक्रो-मॅनेजमेंटमुळेच आर्वी विधानसभेला हे यश मिळवता आले आहे. आर्वीतील कार्यकर्त्यांना 'प्रथम स्थानावर राहण्याची लावलेली शिस्त' आता संपूर्ण जिल्ह्यासाठी एक आदर्श वस्तुपाठ ठरत आहे.

महाराष्ट्रातील टॉप- ४ मध्ये वर्धा जिल्ह्याचा बोलबाला

आर्वी विधानसभेच्या या घवघवीत यशापाठोपाठ वर्धा जिल्ह्यातील इतर मतदारसंघांनीही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राज्यातील क्रमवारीत हिंगणघाट विधानसभा द्वितीय (२रा) स्थानावर राहिला (३५० बूथ, १००ञ कव्हरेज, ८,२०० श्रोते), तर वर्धा विधानसभा चौथ्या (४था) क्रमांकावर राहिला (३१२ बूथ, ९०ञ कव्हरेज, ७,६९१ श्रोते). तसेच देवळी विधानसभा १३व्या स्थानावर राहिला (१५२ बूथ, ४५ञ कव्हरेज, २,१७७ श्रोते). अशाप्रकारे राज्यातील पहिल्या चार क्रमांकांमध्ये वर्धा जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघांचा समावेश असणे, ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब ठरली आहे.

या दैदिप्यमान यशानंतर आमदार सुमित वानखेडे यांनी आर्वी मतदारसंघातील सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि बूथ स्तरावर अहोरात्र मेहनत घेणाऱ्या भाजप कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले व अभिनंदन केले. 'पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचा विचार तळागाळातील प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे. आर्वी विधानसभेतील कार्यकर्त्यांची निष्ठा, समर्पण आणि शिस्तबद्ध नियोजनामुळेच आपण सलग पाचव्यांदा राज्यात प्रथम क्रमांक पटकावू शकलो. हा विजय आर्वीतील प्रत्येक बूथ कार्यकर्त्यांचा आहे,' असा शब्दांत आमदार सुमित वानखेडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

संपादकीय

लोकशाहीत जनता सर्वोपरी



भारतीय लोकशाहीत जनआंदोलनांनी अनेकदा सत्ताधाऱ्यांना माघार घ्यायला भाग पाडले आहे. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी आणि तरुणांच्या भविष्याच्या प्रश्नांवर उभ्या राहिलेल्या विद्यार्थी आंदोलनाने ते पुन्हा एकदा अधोरेखित केले.

भारतीय लोकशाहीमध्ये रस्त्यावरील जनआंदोलनांनी अनेकदा सत्तेची दिशा बदलली आहे. १९७४ मधील गुजरातचे नवनिर्माण आंदोलन, २०११ मधील अण्णा आंदोलन किंवा २०२१ मधील दिल्लीतील शेतकरी आंदोलन असो, या सर्वांनी हे सिद्ध केले आहे की, जनआक्रोशाला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला, तर कितीही मजबूत सरकार असले, तरी त्याला आपली रणनीती बदलावी लागते. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा त्याच राजकीय परंपरेतील नवा अध्याय मानला जात आहे. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात जनतेच्या व्यापक दबावामुळे सरकारला माघार घ्यावी लागलेली ही तिसरी मोठी घटना आहे. यापूर्वी जमीन अधिग्रहण अध्यादेश मागे घेणे, तीन कृषी कायदे रद्द करणे आणि आता शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, या घटनांमधून हे स्पष्ट होते की, ठाम आणि निर्णायक नेतृत्वाची प्रतिमा असलेले सरकारही राजकीय किंमत वाढू लागल्यावर आपली भूमिका बदलते. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा केवळ एका मंत्र्याचा राजीनामा नाही. स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हता, पेपरफुटी, तरुणांच्या भविष्याची चिंता आणि सरकारचे उत्तरदायित्व या मुद्द्यांवर देशभरात निर्माण झालेल्या असंतोषाची ती एक प्रकारची कबुली आहे. सरकारने हा प्रशासकीय निर्णय असल्याचे म्हटले, तर विरोधकांनी तो विद्यार्थ्यांच्या विजयाचे प्रतीक असल्याचे सांगितले.

या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, त्याचे स्वरूप. शेतकरी आंदोलनाला स्पष्ट नेतृत्व होते. नागरिकत्व दुरुस्ती कायद्याविरोधातील आंदोलनामागेही अनेक संघटित गट होते; मात्र यावेळी आंदोलनाचा कोणताही केंद्रीय नेता नव्हता. सोशल मीडिया, यूट्यूब, इन्स्टाग्राम आणि डिजिटल नेटवर्क हेच या आंदोलनाचे खरे व्यासपीठ बनले. नंतर विरोधी पक्षांनी या आंदोलनाला मोठा पाठिंबा दिला; परंतु आंदोलनाने त्यांना स्वतःचे व्यासपीठ वापरू दिले नाही. विद्यार्थ्यांनी आंदोलनाचे नेतृत्व कोणत्याही राजकीय पक्षाकडे दिले नाही. त्यांनी हा संघर्ष कोणत्याही पक्षाचा किंवा संघटनेचा नसून स्वतःच्या भविष्याचा प्रश्न मानून पुढे नेला. सरकारसमोर हेच सर्वात मोठे आव्हान होते. विद्यार्थ्यांनी आंदोलन गांधीमार्गे सुरू ठेवत असतानाच आंदोलनस्थळे 'सेल्फी पॉईंट' आणि उत्साहाचे केंद्र बनवली. त्यामुळे युवकांमध्ये या आंदोलनाविषयी अधिक आकर्षण निर्माण झाले.

पारंपरिक राजकारणात सरकार आंदोलनाच्या नेत्यांशी चर्चा करते, तडजोडी करते आणि हळूहळू आंदोलनाची धार कमी करण्याचा प्रयत्न करते; मात्र या आंदोलनात नेतृत्व विखुरलेले होते. सरकारने सोनम वांगचुक यांच्या माध्यमातून आंदोलन संपविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उपोषणाची सांगता घडवून आणल्यानंतर सरकारला वाटले की, ८० टक्के यश मिळाले; पण सरकारला अजून चुकीचा ठरला. काही प्रमुख चेहऱ्यांनी मवाळ भूमिका घेतली, तरी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांच्या मागण्या कायम राहिल्या. या आंदोलनाने भाजपच्या त्या रणनीतीला आव्हान दिले, ज्यामध्ये कोणत्याही आंदोलनाला विरोधकांचे राजकारण किंवा मर्यादित हितसंबंधी गटांचे आंदोलन ठरवून त्याचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला जात असे. यावेळी मात्र मोठ्या संख्येने असे तरुण रस्त्यावर उतरले होते, जे कोणत्याही वैचारिक संघर्षपेक्षा आपल्या करिअरबाबत आणि स्पर्धा परीक्षांच्या निष्पक्षतेबाबत अधिक चिंतित होते. त्यामुळे हा असंतोष भाजपच्या पारंपरिक सामाजिक आधारापर्यंत पोहोचताना दिसू लागला.

याच टप्प्यावर सरकारमध्ये राजकीय चिंता वाढू लागली. आंदोलन नियंत्रणात आणण्यासाठी अवलंबलेली पद्धत आंदोलन शांत करण्याऐवजी अधिक भडकवणारी ठरली. विशेषतः संसद मार्गनंतर आंदोलन अधिक आक्रमक झाले. विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईमुळे देशभरात त्यांच्याविषयी सहानुभूतीची लाट निर्माण झाली आणि आंदोलन राष्ट्रीय स्तरावर पसरले. अशा स्थितीत राहुल गांधी यांनी पंतप्रधान निवासस्थानासमोर धरणे आंदोलन केले. पोलिसांनी त्यांना बळाचा वापर करून हटवल्यानंतर परिस्थिती आणखी चिघळली. त्यानंतर काँग्रेस आंदोलनात उघडपणे सहभागी झाली आणि सरकारची अडचण वाढली. राहुल गांधी स्वतः रस्त्यावर उतरल्याने आंदोलनाला आणखी वेग मिळाला.

सुरुवातीला भाजपचे सर्वोच्च नेतृत्व शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या पाठीशी उभे राहिले. २२ जुलैच्या राज्यपर्यंत त्यांचा राजीनामा घेतला जाणार नाही, अशीच चर्चा होती; मात्र आंदोलनाचा सातत्याने वाढणारा विस्तार, सोशल मीडियावर सरकार विरोधातील वाढती टीका आणि मित्रपक्षांच्या चिंतेमुळे परिस्थिती बदलली. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या नेतृत्वामध्ये उच्चस्तरीय चर्चेत आंदोलनाच्या सामाजिक परिणामांचा आढावा घेण्यात आला आणि सरकारची रणनीती बदलली. या चर्चेत अशीही चिंता व्यक्त केली की, तरुणांचा रोष केवळ शिक्षणमंत्र्यांपुरता मर्यादित राहिलेला नसून त्याचा परिणाम थेट पंतप्रधानांच्या प्रतिमेवर होत आहे. सोशल मीडियातून आंदोलन ज्या वेगाने विस्तारले, त्याने सरकारच्या पारंपरिक संवाद प्रणालीलाच आव्हान दिले. तरुणांशी थेट संवाद साधण्यासाठी नवीन रणनीतीचा विचार करण्यात आला. सुरुवातीला सरकारने विरोधकांवर राजकारणाचा आरोप केला, परीक्षा सुधारण्याची आश्वासने दिली आणि काही प्रशासकीय बदल केले; मात्र अधिकाऱ्यांच्या बदल्या किंवा सुधारणा जाहीर करून परिस्थिती नियंत्रणात येणार नाही, हे स्पष्ट झाले. तरुणांना ठोस राजकीय संदेशाची अपेक्षा होती.

धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा त्याच संदेशाचा भाग मानला गेला. हा केवळ उत्तरदायित्व निश्चित करण्याचा प्रयत्न नव्हता, तर वाढलेले राजकीय तापमान कमी करण्याचाही प्रयत्न होता. आंदोलन दीर्घकाळ सुरू राहिल्यास त्याचा परिणाम केवळ शिक्षण धोरणापुरता मर्यादित राहणार नाही, तर बेरोजगारी, भरती प्रक्रिया आणि शासनाच्या विश्वासार्हतेसारख्या व्यापक प्रश्नांशी तो जोडला जाईल, याची सरकारला जाणीव झाली होती.

या संपूर्ण घटनाक्रमामुळे विरोधी पक्षांनाही नवी ऊर्जा मिळाली. राहुल गांधी, अखिलेश यादव आणि इतर विरोधी नेत्यांनी आंदोलनाला राजकीय पाठिंबा दिला; मात्र आंदोलनाच्या यशाचे श्रेयही तरुण, सर्वोच्च टक्केवारी किंवा पदवी मिळवणे यावरून मर्यादित नसतो. विद्यार्थ्यांना विचार करण्याची क्षमता देणे, त्यांच्यात चांगल्या मूल्यांची जपणूक करणे आणि त्यांना देशाचे एक जबाबदार नागरिक बनवणे ही शिक्षणाची खरी भूमिका असते; परंतु दुर्दैवाने आजच्या काळात शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणावर बदलला आहे. शिक्षण हे समाजसेवेचे माध्यम न राहता अनेक ठिकाणी तो एक मोठा व्यवसाय बनल्याची भावना पालकांच्या मनात निर्माण होत आहे. त्यामुळे आजच्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा सर्वंकष विचार करण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे.

खासगी शाळांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक अत्याधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, हे वास्तव नाकारता येत नाही; परंतु दुसरीकडे या शाळांचे सतत वाढणारे शुल्क सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी मोठा आर्थिक ताण ठरत आहे. आपल्या मुलांच्या चांगल्या भविष्याला खंड पडू नये म्हणून अनेक पालक कर्ज काढून किंवा स्वतःच्या दैनंदिन गरजा बाजूला ठेवून पै भरतात. या परिस्थितीमुळे शिक्षण हा सर्वांसाठी समान संधी देणारा मूलभूत अधिकार उरला आहे की तो केवळ आर्थिक श्रीमंतींवर अवलंबून असलेला एक विशेषाधिकार बनला आहे? वासाठी खासगी शाळा पूर्णपणे बंद करणे हा उपाय नसून, शाळांच्या शुल्काला पारदर्शकता आणणे, शिक्षणाच्या गुणवत्तेवर शासकीय नियंत्रण असणे आणि सरकारी शाळांचा दर्जा उंचावणे यावर अधिक भर दिला पाहिजे.

आजच्या परीक्षा व्यवस्थेबाबतही अनेक शंका आणि चिंता व्यक्त केल्या जात आहेत. राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमुळे विद्यार्थी आणि पालकांचा संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो. वर्षानुवर्षे दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना काही लोकांच्या गैरप्रकारांमुळे त्रास सहन करावा लागणे अत्यंत अन्यायकारक आहे. या घटनांमुळे संपूर्ण शैक्षणिक चौकटीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते.

याच पार्श्वभूमीवर अनेक घटकांकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी केवळ बारावीच्या गुणांचा आधार घ्यावा, अशी मागणी केली जात आहे. सध्या विद्यार्थ्यांना एकाच प्रवेशासाठी वारंवार वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. यामुळे त्यांच्यावर मानसिक ताण, आर्थिक खर्च आणि अतिरिक्त स्पर्धात्मक भार वाढतो; मात्र सर्व राज्यांतील मूल्यमापन पद्धती आणि मंडळे समान नसल्यामुळे केवळ बारावीच्या गुणांवर प्रवेश देणेही आव्हानात्मक ठरू शकते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना समान न्याय देणारी, पारदर्शक आणि अत्यंत विश्वासार्ह प्रवेश प्रक्रिया विकसित करणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या भरती प्रक्रियेतही मोठे बदल करणे गरजेचे आहे. केवळ पात्रता परीक्षा ही शिक्षकांची मुळ गुणवत्ता तपासण्यासाठी पुरेशी असू शकत नाही. विषयाचे सखोल ज्ञान, शिकवण्याचे कौशल्य, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची कला आणि प्रत्यक्ष मुलाखत या सर्व बाबींचा विचार करून शिक्षकांची निवड केली पाहिजे. यामुळे शिक्षण व्यवस्थेत अधिक सक्षम आणि समर्पित शिक्षक येऊ शकतील. शिक्षणाच्या या संपूर्ण प्रवासात पालकांचा सहभागही अधिक संस्थात्मक आणि प्रभावी असायला हवा. पालकांची भूमिका ही केवळ वेडेवर शाळांचे शुल्क भरण्यापुरती मर्यादित राह नये, प्रत्येक शाळेत पालकांचे प्रतिनिधित्व करणारी एक सक्षम व्यवस्थापन समिती असणे अत्यंत गरजेचे आहे. एखादा शिक्षक सातत्याने अध्यापनात निष्काळजीपणा करत असेल किंवा आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत नसेल, तर या समितीला तक्रार करण्याचा आणि चौकशीची मागणी करण्याचा अधिकार असावा. यामुळे शिक्षकांमध्ये उत्तरदायित्वाची भावना वाढेल आणि शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर आज उत्कळीक बाह्य आणि आरोप-प्रत्यारोप होताना दिसतात. शासनाने आपल्या चुकींच्या निर्णयांमध्ये सुधारणा करण्याची तयारी दर्शवली पाहिजे, तर विरोधकांनी केवळ टीका न करता विधायक आणि योग्य पर्याय सरकारसमोर ठेवले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य कोणत्याही राजकीय संघर्षाचे साधन बनता कामा नये. आज गरज आहे ती शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्याची, खासगी शाळांच्या शुल्काचा नियंत्रण ठेवण्याची आणि विद्यार्थ्यांवरील अनावश्यक ताण कमी करण्याची. शिक्षण ही स्पर्धा नसून सर्वांना पुढे जाण्याची एक समान संधी असावी, तरच एक सक्षम राष्ट्र निर्माण होऊ शकेल.

अवुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम: ए.पी.जे. अब्दुल कलाम

२७ - ३० जुलै:ए.पी.जे.अब्दुल कलाम स्मृतिदिन विशेष.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट शिलॉंग येथे व्याख्यान देत असताना डॉ.कलाम साहेब कोसळले आणि दि.२७ जुलै २०१५ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या ८३व्या वर्षी त्यांचे दुःखद निधन झाले. राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांसह लाखो लोक त्यांच्या गावी रामेश्वरम येथे आयोजित अंत्यसंस्कार समारंभास उपस्थित होते. तेथे त्यांना सन्मानाने दफन करण्यास संपूर्ण राज्य उलटले होते. त्यांच्या पावन स्मृतीला उजाळा देणारा श्री एन. के. कुमार यांचा हा लेख... संपादक.

डॉ.अवुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम ऊर्फ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा सन २००२मध्ये सत्ताधारी भारतीय जनता पक्ष आणि तत्कालीन विरोधी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या पाठिंब्याने भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून निवड झाली. त्यांना पोपल्स प्रेसिडेंट- जनतेचे राष्ट्रपती म्हणून व्यापकपणे संबोधले जाते. राष्ट्रपती पदानंतर ते शिक्षण, लेखन आणि सार्वजनिक सेवेच्या नागरी जीवनात परतले. भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या भारतरत्नसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांचे ते प्राप्तकर्ते होते. ते एक भारतीय एरोस्पेस शास्त्रज्ञ होते. तसेच त्यांनी २००२ते२००७या काळात भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून देखील काम केले होते. कलाम हे तामिळनाडूच्या रामेश्वरम येथे वाढले होते आणि तेथेच त्यांनी भौतिकशास्त्र व एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास केला. त्यांनी पुढील चार दशके शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून काम केले. त्यांनी प्रामुख्याने संरक्षण संशोधन आणि विकास संस्था-डीआरडीओ आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था- आयएसआरओ येथे काम केले. भारताच्या नागरी अंतराळ कार्यक्रमात आणि लष्करी क्षेपणास्त्र विकासाच्या प्रयत्नांमध्ये त्यांचा खुप मोठा सहभाग होता.



अशा प्रकारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि प्रक्षेपण वाहन तंत्रज्ञानाच्या विकासावर केलेल्या काममुळे ते भारताचे मिसाइल मॅन म्हणून ओळखले जाऊ लागले. सन १९९८मध्ये भारताच्या पोखरण-२ अणुचाचण्यांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण संघटनात्मक, तांत्रिक आणि राजकीय भूमिका बजावली. सन १९७४मध्ये भारताने केलेल्या पहिल्या अणुचाचणीनंतरची ही पहिलीच चाचणी होती.

डॉ.अवुल पाकीर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम यांचा जन्मदि. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी येथन बेटावरील रामेश्वरम्चा तीर्थक्षेत्रात तेव्हाच्या मद्रास प्रांतात आणि आजच्या तामिळनाडू राज्यात एका तमिळ मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे वडील जैनुलाब्दीन मारकायर हे बोटीचे मालक आणि स्थानिक मशिदीचे इमाम होते. त्यांच्या आई आशिअम्मा गृहिणी होत्या. त्यांचे वडील बोटीतून हिंदू यात्रेकरूंना रामेश्वरम आणि आता निर्जन झालेल्या धनुषकोडी दरम्यान घेऊन जात होते.

ते त्यांच्या कुटुंबातील चार भाऊ आणि एका बहिणीमध्ये सर्वात लहान होते. त्यांचे पूर्वज हे श्रीमंत मारकायर व्यापारी आणि जमीनीचे मालक होते, तसेच त्यांच्याकडे असंख्य मालमत्ता आणि मोठ्या प्रमाणात जमीनी होत्या. जरी त्यांचे पूर्वज श्रीमंत मारकायर व्यापारी होते, तरीही सन १९२०च्या दशकात कुटुंबाने आपली बहुतेक संपत्ती गमावली होती. डॉ.कलाम यांचा जन्म झाला तोपर्यंत ते गरिबीने ग्रस्त होते. मारकायार हे तमिळनाडू आणि श्रीलंकेच्या किनारपट्टीवर आढळणारे मुस्लिम वंशीय आहेत, जे अरब व्यापारी आणि स्थानिक महिलांचे वंशज असल्याचा दावा करतात. त्यांच्या व्यवसायात मुख्य भूप्रदेश, बेट, श्रीलंका हे ठिकाण आहेत. तेथून किराणा मालाचा व्यापार करणे तसेच मुख्य भूमी आणि पंबन दरम्यान यात्रेकरांना नेणे यांचा समावेश होता. कुटुंबाच्या तुटपुंज्या उत्पन्नात भर घालण्यासाठी लहानपणी त्यांना वर्तमानपत्रे विकावी लागली. सन १९१४मध्ये मुख्य भूभागावर पंबन पूल उघडल्यानंतर तथापि, व्यवसाय अयशस्वी झाले. वडिलोपार्जित घारव्यातिरिक्त कालांतराने कौटुंबिक संपत्ती आणि मालमत्ता नष्ट झाली.

त्यांच्या शालेय वर्षांमध्ये त्यांना सरासरी गुण मिळायचे, परंतु त्यांना शिकण्याची तीव्र इच्छा असलेले एक तेजस्वी आणि मेहनती विद्यार्थी म्हणून ओळखले जायचे.

ते त्यांच्या अभ्यासात विशेषतः गणितावर वराच वेळ घालवायचे. बाटर्ड्डाय्रस सेकंडरी स्कूल, रामनाथपुरम येथे शिक्षण पूर्ण केल्यानंतर कलाम साहेबांनी सेंट जोसेफ कॉलेज तिरुचिरापल्ली येथे प्रवेश घेतला. हे महाविद्यालय तेव्हा मद्रास विद्यापीठाशी संलग्न होते.

तेथून त्यांनी सन १९५४मध्ये भौतिकशास्त्रात पदवी प्राप्त केली. मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास करण्यासाठी ते सन १९५५मध्ये मद्रासला गेले. ते एका वरिष्ठ वर्गाच्या प्रकल्पावर काम करत असताना डीन त्यांच्या प्रगतीच्या अभावामुळे असमाधानी होते. पुढील तीन दिवसांत प्रकल्प पूर्ण न झाल्यास त्यांची शिष्यवृत्ती रद्द करण्याची धमकी दिली. त्यांनी अंतिम मुदत पूर्ण करून डीनला प्रभावित केले. फायटर पायलट होण्याचे त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यात ते थोडक्यात चुकले, कारण ते पात्रता फेरीत नवव्या स्थानावर होते आणि आयएएफमध्ये फक्त आठ जागा उपलब्ध होत्या.

प.पू.कलाम साहेब शिलॉंगच्या भारतीय शास्त्र व्यवस्थापन येथे पृथ्वी नावाचा एक जिवंत ग्रह तयार करणे या विषयावर व्याख्यान देण्यासाठी गेले. पायरीवरून जात असताना त्यांना काहीसे अस्वस्थ वाटले. परंतु थोड्या विश्रांतीनंतर सभागृहात प्रवेश करण्यास सक्षम झाले. संध्याकाळी सुमारे साडेसहा वाजता व्याख्यान देताना ते स्टेज वरून कोसळले. त्यांना जवळच्या बेथनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. आगमनानंतर त्यांच्यात नाही किंवा जीवनाची इतर चिन्हे दिसली नाहीत. आयसीयू युनिटमध्ये उपेक्षण आले, तरी त्यांना सायंकाळी ७-४५ला हृदयविकाराच्या दुसऱ्या झटक्यानंतर मृत घोषित करण्यात आले. ती काळरात्र होती दि. २७ जुलै २०१५ रोजीची! त्यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी ३० जुलै रोजी पंतप्रधान, तामिळनाडूचे राज्यपाल, कर्नाटक, केरळ व आंध्रप्रदेश येथील मुख्यमंत्री यांच्यासह साडेतीन लाखाहून अधिक लोक उपस्थित होते. विविध समाज माध्यमांवरून सविनय साभार जी!

!! अशा या महान शास्त्रज्ञांस स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !!

श्री एन. के. कुमार गुरुजी.
मु. पिसेवडशा, ता. आरमोरी.
जि. गडचिरोली, फक्त व्हॉट्स्अप. - ९४२३७१४८८३.

कारगिल युद्ध होण्याचे प्रमुख कारण!

२६ जुलै: भारतीय कारगिल विजय दिवस.



कारगिल युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे आहे? कुठ उद्हारण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश आण्वस्सज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. शेजारी कारगिल युद्ध भारताने जिंकले. सदर माहितीपूर्ण गोषवरा लेख श्री कृष्णकुमार आनंदे-गोविंदा निकोडे गुरुजी प्रस्तुत करताहेत... संपादक.

इ.स.१९९८-९९च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक गुप्तहरांना मुजाहिदीनच्या वेशात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले. या कारवाईला ऑपरेशन बद्र असे नाव देण्यात आले. कुणाच्याही लक्षात न येता त्यांनी त्रिकाम्बा भारतीय चौक्यांचा ताबा घेतला. हिवाळ्यात प्रचंड थंडीमुळे सैन्य माघारी घेतले गेले. नियंत्रणरेषेच्या जास्तीत जास्त आत घुसखोरी करून राष्ट्रीय महामार्ग १५च्या वरळ यायचे. असे केले, की महामार्गावर कायमस्वरूपी ताबा मिळवता येईल. तेथेन. नंतर राजकीय वजन वापरून भारताच्या आंतरराष्ट्रीयकरण करणे पाकिस्तानला सोपे पडेल, असा हा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. भारताला नवीन नियंत्रणरेषा मान्य करायला भाग पाडले, की लढाख व सियाचीनला भारतापासून तोडणे सोपे जाईल, असा पाकिस्तानी युद्धनीतिज्ञांचा कयास होता. तसेच घुसखोरीदरम्यान कारागील- काश्मीर परिसरात अंतर्गत बंडखोरी भडकावून भारताला आतून बुचकळ्यात पाडण्याचा पाकिस्तानी व्यूह होता. भारतीयांची सियाचीन हिमनदीवर नियंत्रण मिळवण्याता जी क? त्याची वापरली. तसाच काहीसा प्रकार पाकिस्तानने केला, असा काही लेखकांचा सूर होता.

कारगिल युद्ध हे भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान सन १९९९च्या उन्हाळ्यात लढले गेलेले मर्यादित युद्ध होते. या युद्धाची व्याप्ती भारताच्या कारगिल व आजूबाजूच्या परिसरापुरतीच मर्यादित राहिली, त्यामुळे याला मर्यादित युद्ध म्हणतात. तसेच या पूर्वीच्या भारत-पाक युद्धांप्रमाणेच याही युद्धात, युद्ध सुरू झाल्याची व संपल्याची कोणतीही घोषणा करण्यात आलेली नव्हती. उलट पाकिस्तानतर्फे युद्धादरम्यान त्यांचा देश अलिप्त आहे, असा कांगावा करण्यात आला होता. पुढे अनेक वर्षानंतर हळूहळू पाकिस्तान सरकारने व अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी हे युद्धच होते, असे जाहीर केले. सन १९९९च्या उन्हाळ्यात पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठाणी कब्जात घेतल्याचे भारताच्या लक्षात आले. या घुसखोरांना हुसकावण्यासाठी कारगिलचे युद्ध सुरू झाले. ही ठाणी कारगिल व द्रास परिसरातील अतिउंच दुर्गम जागी होती. अनेक महिन्यांच्या प्रयत्नांनंतर भारताला ही ठाणी परत मिळवण्यात यश मिळाले. कारगिल हे शहर जम्मू आणि काश्मीरची राजधानी श्रीनगरपासून २०५ किमी अंतरावर भारत-पाक आंतरराष्ट्रीय नियंत्रण रेषेपासून जवळ आहे. हिमालयाच्या इतर भागाप्रमाणे कारगिलमध्येही थंड वातावरण असते. उन्हाळाहा सौम्यतर हिवाळा अतिशय दीर्घ व कडक असतो. बऱ्याचदा तापमान -४० अंशापर्यंतही उतरू शकते. राष्ट्रीय महामार्ग लेह ते श्रीनगर या रस्त्यावर कारगिल वसलेले आहे. कारगिलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हा रस्ता हे होय. घुसखोरांनी पाकव्याप्त काश्मीरच्या उंचावरून आणि रस्त्यातला सर्पिल आणि अशा १६० किलोमीटरच्या पट्यातच साधारणपणे घुसखोरी केली. लष्कराच्या अनेक चौक्या या भागात आहेत. त्यातील काही चौक्या समुद्रसपाटीपासून पाच हजार मीटरपेक्षाही अधिक उंचावर आहेत. नुसतेच कारगिल नव्हेत तर आम्नेयेकडील द्रास व नैर्ऋत्येकडील मश्को खो-यातील, तसेच बटालिक विभागातील चौक्यांवरही घुसखोरी झाली.

कारगिल शहर हे सामरिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. इ.स.१९७१च्या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये बेट मोठे युद्ध झाले नाही. तरी सातत्याने छोट्या मोठ्या चकमकी होत आहेत. भारतीयांच्या सियाचीन हिमनदीवर तसेच सभोवतालच्या परिसरावर निर्यंत्रण मिळवण्यात दोन्ही बाजू सातत्याने प्रयत्नशील असतात. इ.स.१९८०च्या सुमारास पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पंजाबात खलिस्तानच्या नावावर दंगा घातला. तसेच इ.स.१९९०च्या सुमारास काश्मीरमध्ये दहशतवादाने मूळ धरले. परिणामी भारताने काश्मीरमध्ये कायमस्वरूपी सैन्य तैनात केले. हे दहशतवादी सुरुवातीच्या काळात काश्मीरमधील असत व त्यांना प्रशिक्षित करून पाठवले जात असे. काही काळानंतर पाकिस्तानी सैनिक, अधिकारी व तालिबानी अफगाणिस्तानातील भाडोती आतिरेक्यांनाही काश्मीरमध्ये पाठवले जाऊ लागले. पाकिस्तानने नेहमीच या बाबतीत आपला सहभाग असल्याचाइन्कार केला. कारगिलच्या युद्धातदेखील पाकिस्तानने हीच खेळी वापरली व घुसखोरे हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक आहेत, असे जगाला सांगण्याचा प्रयत्न केला. इ.स.१९९८मध्ये भारत पाकिस्तानने आणुचाचण्या केल्यानंतर दोन्ही देशांतील संबंध सांगलेच ताणले गेले. परंतु तत्कालीन पंतप्रधान मा.वाजपेयी साहेबांनी मैत्रीचा हात पुढे करून संबंध निवळण्याचाप्रयत्न? केले. त्यासाठी तेस्वत: लाहोरला जाऊन आले होते.

द्रास व मश्को खो-यातील चौक्या या अतिउंचीवर आहेत. अतिउंचावरील चौक्यांवर कडक हिवाळ्याच्या महिन्यांत सैन्य तैनात करून ठेवणे अतिशय अवघड असते. हिवाळ्यापूर्वी दोन्ही बाजूंने सैन्याची माघार व्हावी, उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर व हवामान मानवी वास्तव्यास स्थिर झाल्यानंतर ते ते सैन्य आपापल्या चौक्यांमध्ये परतावे, असा आतिखित समझौता भारत-पाकिस्तानमध्ये, कारगिल युद्धाच्या आधीपर्यंत होता. मात्र सन १९९९ साली भारतीय सैन्य भारतीय चौक्यांवर परतण्यापूर्वीच पाकिस्तानी घुसखोरांनी ऐन हिवाळ्यात चौक्यांचा ताबा घेतला. त्यामुळे कारगिलचे युद्ध भडकण्यास टिणगी पडली. याचीक्यांचा ताबाघेतला गेल्याने राष्ट्रीय महामार्ग १ए- एनएच१ हा पाकिस्तानी तोफगोळ्यांच्या आणखी जवळच्या टप्प्यात आला. तसेच उंचावरील चौक्यांचा ताबा घुसखोरांकडे गेल्याने त्यांना उतारावरील चौक्यांवर निर्यंत्रण ठेवणे सोपे गेले. या चौक्या डोंगरमाथ्यावरील किल्ल्याप्रमाणे होत्या. त्यांचा ताबा मिळवण्यास मोठ्या प्रमाणावर फौजेची गरज लागते. तसेच अतिउंची व बडाबऱ्याची थंडी हे काम अजूनच अवघड करते.

हे युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे आत्पर? कुठ उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश आण्वस्सज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे राखवलेल्या संयमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले. म्हणूनच भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळाला व याउलट, सैन्य मागे घ्यावे, यासाठी पाकिस्तानवर अमेरिकेसह अनेक देशांनी दबाव आणला. या युद्धानंतर भारताने आण्वस्त्र सज्जता अनेक पटींने वाढवली. तर पाकिस्तानात राजकीय अस्थिरता माजली. परिणामी काही महिन्यांतच- ऑक्टोबर १९९९मध्ये पाकिस्तानात जनरल परवेझ मुशर्रफ यांनी नवाझ शरीफ यांचे सरकार उलथून लष्करशाही लागू केली. कारगिल युद्ध भारताने जिंकले. बविध समाज माध्यमांवरून सविनय साभार जी!

!! कारगिल विजय दिनाच्या सर्व देशप्रेमी भारतीय बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

-संकलन व शब्दांकन -
श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
मोबा- ९६१९८३६७१७.

सावट ..

धाड्याईडी छापेमारी
नको कसले सावट
आरंभशूरे कारवाई
आधी करावा शेवट

मागेलावी काहीतरी
सत्ताधारी बा चावट
एकापक्षांत राहणारे
घाबरट अति चिवट

सत्ताछत्र डोक्यावरी
खुशालव्हावे खावट
कसेही वागावे तरी
करते मिडीयावटवट

प्रतिपक्षाचे रे प्रवक्ते
असतात आडचावट
हँडलकरावी मिडिया
फोटो शापर अर्चवट

प्रतिपक्षा प्रवेश जंगी
अत्याकर्षकसजावट
सन्मानपूर्वक जायचे
उठून दिसो खुलावट

धुंदीतमस्त कार्यकर्ते
डोळ्यां यावा तरावट
खुशालव्येवो मजमुळ
शेअरबाजार गिरावट

जुन्यापक्षा ना जुमाने
करो किती रूकावट
जाणा-या दईआमिषे
असतेअशीच वहावट

हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

खतावणी ..

एकामागूनि दुस-यां
चालू राही सतावणी
आरोप लावून पाठी
पापे भरा खतावणी

आहेत पुरावे म्हणत
देतामिथ्या चेतावणी
खरे वाटू लागे अंति
खोटीअशी बतावणी

शोधून काढा लफडी
भरगच्च भरे छावणी
ए.आय तंत्रज्ञान भले
लावा युक्त्या दावणी

जीभ जरा घसरताच
सुरुकरायची लाव

युवकांना प्रत्येक क्षेत्रात संधी दिली पाहिजे : अनिल वीर



सातारा : जंतरमंतरची लढाई विद्यार्थ्यांनी जिंकल्याने बलाढ्य सरकारला नामोहरम केले. नवभारत निर्माण करण्यासाठी युवकांशिवाय तरणोपाय नाही.सध्याची परिस्थिती भयावह आहे.तेव्हा युवकांमध्ये जी मरगळ आली आहे.ती झटकून टाकण्यासाठी त्यांना प्रत्येकक्षेत्रात संधी दिली पाहिजे. असे आवाहन बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर यांनी केले.

बंधुत्व कार्यशाळेचे आयोजन शेंद्रे,ता.सातारा येथील ग्रामपंचायतीच्या अशोकराव मोरे (तात्या) सभागृहात करण्यात आले होते.तेव्हा प्रमुख पाहुणे म्हणून बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर मार्गदर्शन करीत होते. अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते विजय पोतेकर होते. यावेळी सरपंच अस्टम मुलाणी उपस्थित होते.

अनिल वीर म्हणाले, 'समाजात बंधुभाव वाढविण्यासाठी बंधुत्व कार्यशाळा नक्कीच यशस्वी होईल.मुळातच जिल्हा शूरवीर व समाजधुरीणांचा असल्याने प्रत्येकांनी महापुरुषांच्या विचारांवर वाटचाल करावी. युवकांना आळशी करू नका. पालक म्हणून त्यांना कोणतेही काम-व्यवसाय अथवा अधिकार द्या.नकळीच ते लीलया पेलतील.युवक सर्व क्षेत्रात पारंगत आहेत.त्यांना चालना देणे प्रस्थापित व वरिष्ठांचे काम आहे.गावात चांगुलपणा राखण्यासाठी सर्व समाजघटकांनी कार्यरत असले पाहिजे.' आताचीं पिढी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी युवकांचा मुख्य प्रवाहात आणले पाहिजे. असाही पुनरुच्चार वीरसर यांनी केला.

सरपंच अस्लम मुलाणी म्हणाले, 'संविधानाने हक्क दिले आहेत.त्याचा वापर सामाजिक सलोखा व बंधुत्व निर्माण करण्यासाठी केला पाहिजे.गीसुद्धा संविधानामुळे सरपंच झालो आहोत. गावामध्ये महापुरुषांची जयंती सर्वांनी मिळून एकच होण्यासाठी माझा आग्रह असतो.तेव्हा कोणत्याही प्रकारचे मतभेद असता कामा नये.मित्र जोडले पाहिजेत. चर्चा-संवाद यातून सुकर मार्ग काढता येतो.संघटीत राहिल्याचे नक्कीच गावांचा सर्वांगीण विकास होईल.'

अंनिसचे भगवान रणदिवे यांनी मानूस शिकला की शहाणा...यावर विज्ञानवादी गीत सादर केले.ते म्हणाले, 'जात हीच अंधश्रध्दा आहे.'

यावेळी मानवतावाद आणि बंधुत्व निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून बहुजनांची विचारधारा कशा पद्धतीने विकसित करता येईल? या प्रमुख विषयावर प्रशिक्षक प्रकाश काशीळकर यांनी सविस्तरपणे मार्गदर्शन केले.ते म्हणाले, समाजामध्ये सर्व सुरळीत असताना वेळेचे नियोजन का होत नाही ? तेव्हा सर्वांनीच वेळेचा सदुपयोग करावा.असे विविध उदाहरणाद्वारे त्यांनी स्पष्ट केले.प्रथमतः मान्यवरांच्या हस्ते छ.शिवराय यांच्या मूर्तीवरोवरच डॉ.आंबेडकर, माता रमाई व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.अंकित वाघमारे यांनी प्रास्ताविक केले.रवींद्र वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले.सदरच्या कार्यक्रमास मनोहर सावंत (?ट्रॉसिटी समिती),पीएसआय रामदास वाघमारे,संजय कांबळे, ?ड.विलास वहागावकर, अनिल वाघमारे,वसंत गंगावणे,अनिलरुद्ध वीर, सिद्धार्थ वाघमारे, किशोर अवघडे, कुणाल देवकुळे,बाळू वाघमारे, संभाजी मोहिते, यशवंतभाऊ जाधव, दयाराम वाघमारे,इंदुबाई माने, युवक, ग्रामस्थ आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

आषाढी एकादशीला कवठे येमाईत वारकरी सेवेला भक्तीचा स्पर्श



प्रतिनिधी / धनंजय साळवे

कवठे येमाई : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त कवठे येमाई येथे आयोजित करण्यात आलेल्या फराळ वाटप उपक्रमाला भाविक, वारकरी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विठ्ठलभक्तांच्या सेवेसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. सकाळपासूनच मोठ्या संख्येने वारकरी या ठिकाणी दाखल होत होते आणि आयोजकांकडून त्यांचे प्रेमाने स्वागत करून फराळ व पिण्याच्या पाण्याचे वाटप करण्यात आले.

श्री गणेशा मेडिकलसमोर, अष्टविनायक हायवे, कवठे (ता. शिरूर, जि. पुणे) येथे हा सेवाभावी उपक्रम पार पडला. वारकऱ्यांना फराळ, पिण्याचे पाणी आणि अल्पोपहाराचे नियोजनबद्ध वाटप करण्यात आले. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे वारकऱ्यांनी आयोजकांचे मनापासून आभार मानत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

या उपक्रमाचे आयोजन अमोल काटकर (सुखकर्ता फार्म प्रोड्युसर कंपनी), अविनाश पोकळे (युवानेते) आणि डॉ. विलास कोंदळकर (श्री साई क्लिनिक) यांच्या सौजन्याने करण्यात आले. स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध नियोजन करत प्रत्येक वारकऱ्यापर्यंत फराळ वेळेत पोहोचेल आणि कोणालाही गैरसोय होणार नाही, याची विशेष दक्षता घेतली.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने 'वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा' हा संदेश या उपक्रमातून प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर ठेवण्यात आला. सामाजिक बांधिलकी आणि धार्मिक श्रद्धेचा सुंदर संगम घडवून आणणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातील नागरिकांनी भरभरून स्वागत केले. भविष्यातही अशाच समाजोपयोगी आणि सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला.

स्वर्गीय अश्विन पाटील मित्र परिवार तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन;

तालुका प्रतिनिधी /विठ्ठल ममतावादे

उरणचे उत्तम खेळाडू स्वर्गीय अश्विन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत अश्विन पाटील मित्र परिवाराच्या माध्यमातून श्री साई ब्लड बँक, पनवेल यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबिर गुरुवार, दि. ३० जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत श्री. मा. बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल, उरण शहर येथे होणार आहे.

'रक्ताचा आहे येंव येंव मौल्यवान, याची असावी सर्वांना जाण; म्हणूनच करावे रक्तदान' या सामाजिक संदेशातून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ सामाजिक कार्य असून, आपल्या एका रक्तदानामुळे गरजू रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे या उपक्रमात युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे.या सामाजिक उपक्रमाचे आयोजक अश्विन पाटील मित्र परिवार असून, वाढदिवसा निमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.



रक्तदान शिबिराच्या अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संपर्क :
तुषार पाटील : ८९७६७४६४७४,
गणेश पाटील : ९८३३००१३९३,
पप्पू सूर्यराव : ९८२१६२५३६२,
सागर मसुरकर : ९६९९२६७३५५,
मयुरेश पाटील : ८८५०१९९३७३,
कौशिक भोईर : ९८९२८६९२९१

आई एकवीरा मातेच्या जयघोषात ९ ऑगस्ट रोजी 'भव्य बाईक रॅली';



उरण : आई एकवीरा मातेच्या भक्तीभावाने प्रेरित होऊन आई एकवीरा मंदिर, कोप्रोली, उरण ते श्री क्षेत्र कार्ला (एकवीरा) गड अशी भव्य बाईक रॅलीचे आयोजन रविवार, दि. ०९ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आले आहे.उरण मध्ये पहाटे ६.३० वाजता आई एकवीरा मंदिरात आरती झाल्यानंतर उरण मधून रॅलीला सुरुवात होणार आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देऊन बोल-ताशांच्या गजरात रॅली मार्गस्थ होईल. श्री क्षेत्र कार्ला येथील आई एकवीरा मातेचे दर्शन घेतल्यानंतर आई एकवीरा मंदिर परिसराची स्वच्छता, वृक्षारोपण आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून, भक्तीवरोवरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात येणार आहे.

या भव्य बाईक रॅलीच्या आयोजनात विविध गावातील भाविक भक्तांचा सहभाग आहे.रॅलीच्या आयोजनासाठी संपूर्ण नियोजन व मार्गदर्शन संस्थापक देविचंद अनंत म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.आई एकवीरा मातेच्या जयघोषाने आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित या भव्य बाईक रॅलीत शिवप्रेमी, एकवीरा भक्त आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

नावे नोंदणी व संपर्कासाठी फोन नंबर :-
विकी कोळी (कोप्रोली) – ९८२०६७३४८४,
जितू कोळी (कोप्रोली) – ९९३०३०५२५५,
चेतन गावंड (पिरकोन) – ९८१९६७९९०५,
विधाता पाटील (कोप्रोली) – ९९२०६३२०११,
कुणाल म्हात्रे (कोप्रोली) – ७७७७००१०८७,
प्रसाद पाटील (गोठ्या) – ७९६६६०४०३२,
विनायक गावडे (पिरकोन) – ८०७९२९५४७६,
दृशंत ठाकूर (पानदिवे) – ८८२८६८६६९७,
अक्षय मोकाशी (पानदिवे) – ८०८२२५८८२९,
संस्थापक देविचंद अनंत म्हात्रे – ९८२१८३८४०८

डॉ. तुषार पाचुंदकर यांचा दिल्लीत 'इंडिया स्पिरिच्युअल लीडर्स अवॉर्ड्स २०२६'ने गौरव



पुणे जिल्हा प्रतिनिधी/
विवेकानंद फंड

'इंडियाज नेक्स्ट मास्टरमाइंड अवॉर्ड्स'तर्फे आयोजित 'इंडिया स्पिरिच्युअल लीडर्स अवॉर्ड्स २०२६' हा भव्य पुरस्कार सोहळा १८ जुलै २०२६ रोजी नवी दिल्ली येथील द तिवोली येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या प्रतिष्ठित सोहळ्यात रांजणगाव देवस्थान ट्रस्टचे सचिव डॉ. तुषार पाचुंदकर पाटील यांना आदर्श विश्वस्त या सन्मानाने गौरविण्यात आले. हा पुरस्कार श्री श्री १००८ महामंडलेश्वर अनुरागजी पूरी (हनुमान धाम) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.या पुरस्कार सोहळ्यात अध्यात्म, योग, वैदिक अध्ययन, मानसशास्त्र, रेकी, वास्तुशास्त्र, ज्योतिष, लाईफ कोचिंग, हिप्नोथेरपी, होलिस्टिक हेल्थ, स्पिरिच्युअल टेक्नॉलॉजी आदी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या देशभरातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला आचार्य प्रेमचंद शर्मा (वैदिक), आचार्य के. वेंकटरमन (श्री काशी विश्वनाथ देवस्थान ट्रस्ट, वाराणसी), लेखिका नवना कूंदू, दुबईचे चित्रपट निर्माता डॉ. मनसूर ए. ए. ओबेडिली यांच्यासह आध्यात्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. तुषार पाचुंदकर पाटील यांच्या अध्यात्म आणि समाजसेवा क्षेत्रातील योगदानाचे विशेष कौतुक केले. समाजात सकारात्मक परिवर्तन घडविणाऱ्या व्यक्तींना अशा पुरस्कारांच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. तुषार पाचुंदकर पाटील यांनी हा सन्मान आपल्या कार्याची पावती असून समाजाप्रती असलेली जबाबदारी अधिक वाढविणारा असल्याची भावना व्यक्त केली. या पुरस्काराने नवचैतन्य आणि प्रेरणा मिळाली असून भविष्यातही आध्यात्मिक तसेच सामाजिक क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करत राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

संपूर्ण कार्यक्रमात सांस्कृतिक सादरीकरणे, प्रेरणादायी मनोगते आणि पुरस्कार वितरणाचा दिमाखदार सोहळा यामुळे उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

माझ्या पंढरीची वारी जगात भारी : महेंद्रशेठ घरत

स्वयंसेवक आणि पोलिस प्रशासनाला सॅल्युट.

तालुका प्रतिनिधी /विठ्ठल ममतावादे

उरण : माऊली माऊलीच्या जयघोषात, जय जय राम कृष्णा हरी नाम घोषात पंढरपूर दुमदुमले आहे. अक्षरशः लाखो भक्तांचा महासागर पाहून मन तृप्त झाले. पंढरपूरचा शिवाजी चौकते विठ्ठल मंदिर आणि चंद्रभागा नदीला आलेला भक्तांचा महापूर ओलांडताना आणि असंख्य भक्तांच्या लाटा अंगावर झेलताना आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव आणि आनंद मिळाला. दिनदुबळे, कष्टकरी विठ्ठलाचरणी लीन होण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले २० ते २५ लाख भाविक, दर्शनासाठी १५ ते २० किलोमीटर लांबच्या लांब लागलेल्या रांगा पाहून भक्तांच्या सहनशीलतेला आणि श्रद्धेला सलाम करायलाहवा. मी जगभर फिरतो; नुकताच अमेरिकेत जाऊन अर्जेंटिना-स्पेन फुटबॉल अंतिम लढतच्या सामन्याचा सहपरिवार आनंद घेतला. तेथून १७ ते १८ तास प्रवास करून आल्यानंतर तातडीने पंढरपूर गाठले. कारण १९९७ पासून मी आषाढी एकादशीची वारी न चुकता दरवर्षी करतो. कोविडचा अपवाद वगळता माझ्या पंढरपूर वारीला २५ वर्षे झाली. त्यामुळे वारीतील भक्तांच्या चेहऱ्यावरील तो निरागस आनंद, सुख पाहून मला अभिमानाने म्हणावेसे वाटते, माझ्या पंढरीची वारी जगात भारी,' असे



आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते महेंद्रशेठ घरत शनिवारी (ता. २५) विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा घातल्यानंतर म्हणाले. ते पुढे म्हणाले, 'वारीतील भक्तांचा कमालीचा शिस्तबद्धपणा, कुठलाही त्रास न करता मिळेल त्या रस्त्याने हरिनामात तल्लीन झालेले भाविक, दर्शनासाठी जाताना जागा मिळेल तिथे तंबू ठोकलेले भाविक, तहानभूक विसरून माऊली माऊलीचा जयघोष करणारे वारकरी पाहून महाराष्ट्रात, संतांच्या भूमीत जन्माला आल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. आषाढी एकादशी वारी हे महत्त्वाचे जणू वैभव आहे. तसेच लाखोंच्या गर्दीला आवरण्यासाठी स्वयंसेवक आणि पोलिस प्रशासन यांच्या कामगिरीला सॅल्युट करावासा वाटतो.'

शुक्रवारी महेंद्रशेठ घरत यांनी कांबे-सत्यवनी येथून पंढरपूर येथे दाखल झालेल्या दिंडीत सहभागी होऊन वारकरी यांच्यासोबत महाप्रसाद घेतला. यावेळी युवा अध्यक्ष निखिल डवळे उपस्थित होते, तर शनिवारी चंद्रभागेच्या वाळवंटात भक्तांच्या महासागरात महेंद्रशेठ घरत बुडले. त्यानंतर त्यांनी तरघर, उलवे येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी प्रासादिक भजन मंडळाच्या दिंडीला भेट दिली. यावेळी मनोहर ओवळेकर, उत्तम कोळी आणि वारकरी बंधूंनी महेंद्रशेठ घरत आणि गुलाबशेठ घरत यांचे स्वागत केले.

तांबे हायस्कूल कुडली येथे आषाढी एकादशी उत्साहात साजरी..

गितांजली लव्हाळे /बीड

प्रतिनिधी :-

आषाढी एकादशी निमित्त तांबे हायस्कूल, कुडली येथील विद्यार्थी व शिक्षकांनी गावामध्ये विठ्ठलाची दिंडी काढून भक्तिमय वातावरणात वारी साजरी केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात सहभाग घेत गावकऱ्यांना भक्ती, संस्कार व सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.यावेळी शिक्षक वृंद विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



'शिक्षण परिषद उत्साहात संपन्न'



बीड :- केंद्र शाळा कुडली येथे आज शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास केंद्रप्रमुख सौ. प्रिया पवार, माजी केंद्रप्रमुख उमेश माडेश्वर तसेच केंद्र शाळेचे मुख्याध्यापक मोहन राठोड, तसेच सर्व शाळेचे मुख्याध्यापक व उपशिक्षक उपस्थित होते. यावेळी केंद्रप्रमुख सौ. प्रिया पवार यांनी शिक्षकांना आनापान (ध्यान) प्रशिक्षण देऊन त्याचा दहा मिनिटांचा प्रत्यक्ष सराव करून घेतला. तसेच 'गृह या विषयावरील प्रशिक्षणही देण्यात आले. कार्यक्रमात शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रशिक्षणाचा लाभ घेतला. शेवटी भोर सर यांनी सर्वांचे आभार मानून शिक्षण परिषदेची सांगता केली.

'गुणवत्तापूर्ण शिक्षणावर तडजोड नाही; विद्यार्थी हितासाठी अभाविपचा सातत्यपूर्ण लढा' – आशीष चौहान

अभाविप मुंबई महानगराच्या 'छात्र सत्ता' स्टुडन्ट लीडर मीटमध्ये नव्या महानगर कार्यकारिणीसह ६० महाविद्यालयांच्या अध्यक्ष-मंत्र्यांची घोषणा

मुंबई : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, मुंबई महानगराच्या वतीने आयोजित 'छात्र सत्ता' स्टुडन्ट लीडर मीट कार्यक्रम आज यशवंतराव चव्हाण सेंटर, फोर्ट, मुंबई येथे उत्साहात पार पडला. यावेळी सन २०२६-२७ या कार्यकालासाठी अभाविप मुंबई महानगराचे नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून संदीप शिंदे तसेच नवनिर्वाचित महानगर मंत्री म्हणून कु.अभिषेक पवार यांच्यासह नव्या महानगर कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. तसेच मुंबई महानगरातील सुमारे ६० महाविद्यालयांच्या अध्यक्ष व मंत्र्यांची (सचिव) घोषणा करण्यात आली. याशिवाय ५० कार्यकर्त्यांना महानगर कार्यकारिणीमध्ये विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

कार्यक्रमास अभाविपचे राष्ट्रीय संघटन मंत्री श्री. आशीष चौहान, राष्ट्रीय मंत्री कु. पायल किनाके तसेच पंजाब विद्यापीठ विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गौरव सिंह सोहेल यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

राष्ट्रीय संघटन मंत्री आशीष चौहान यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणावर कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नसून विद्यार्थी हितासाठी अभाविपने सातत्याने संघर्ष केला असल्याचे सांगितले. एनटीएसमोरील आंदोलन असो वा परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकतेसाठीचा लढा, सर्वप्रथम रस्त्यावर उतरलेली संघटना अभाविपच होती, असे त्यांनी नमूद केले. तसेच व्यक्तिनिर्माणातूनच राष्ट्रनिर्माण साध्य होत असून विकसित भारतासाठी सक्षम युवाशक्ती निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले.



राष्ट्रीय मंत्री पायल किनाके यांनी विद्यार्थ्यांना अभाविपच्या विचार, कार्यपद्धती व विद्यार्थी चळवळीच्या विधायक भूमिकेची ओळख करून देत सामाजिक जाण, राष्ट्रीय विचार आणि नेतृत्वक्षमतेसह कार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी मार्गदर्शन करताना गौरव सिंह सोहेल म्हणाले, 'ज्ञान, शील, एकता हा केवळ घोष नसून विकसित भारताच्या निर्मितीचा मंत्र आहे.' विद्यार्थ्यांनी वैयक्तिक प्रगतीसोबतच राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत सक्रिय योगदान द्यावे, असे त्यांनी आवाहन केले.

मुंबई महानगरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात आगामी कार्यकालात विद्यार्थी हिताचे प्रश्न, संघटन विस्तार आणि विविध उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील १६.९६ लाख पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

मुंबई: राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना – २०२६' अंतर्गत १६ लाख ९६ हजार पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या याद्याही लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली. या योजनेअंतर्गत राज्यातील सुमारे ५६ लाख पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी लाभ मिळविण्यासाठी ?ग्रीस्टॅकवर नोंदणी करून आधार प्रमाणीकरण प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

योजनेतील पात्र लाभार्थ्यांची यादी संबंधित बँकांनी महाआयटीने विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड केली असून त्याची पडताळणी पूर्ण झाली आहे.

जंतर मंतर आंदोलनाचे पडसाद कराडमध्ये 'लाठी नव्हे न्याय हवा' च्या घोषणांनी परिसर दणाणला



कराड : केंद्र सरकारच्या विरोधात विद्यार्थ्यांचा आक्रोश
दिल्ली येथील विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी चार्जच्या निषेधार्थ व देशाचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कराड येथेतहसील कार्यालय मोर्चा काढण्यात आला यावेळी हजारोंच्या संख्येनेविद्यार्थी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते NEET पेपरफुटी प्रकरणात कठोर कारवाई आणि पारदर्शकतेच्या मागणीसाठी गेल्या काही दिवसांपासून शांततामय मार्गाने आंदोलन करत आहेत. मात्र कालच्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी विद्यार्थ्यांवर लाठीमार केल्याचा आरोप आहे. मोर्चातील वक्त्यांनी सांगितले की, 'विद्यार्थी आपल्या हक्कासाठी आणि न्यायासाठी रस्त्यावर उतरले आहेत. त्यांच्यावर बळाचा वापर करणे ही लोकशाहीची गळचेपी आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर लाठीचार्ज करणे अत्यंत निंदनीय आहे.'घटनेच्या पार्श्वभूमीवर कराडमध्येएक दिवशीय उपोषणासाठी आदिशक्ती महासंघाच्या अश्विनी वेताळ सविता काशीद यांनी पुढाकार घेतला होता यावेळी कराड वकील संघटना यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला या आंदोलनासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होतेकराडच्या तहसीलदार कल्पना ढवळे यांनी आंदोलकांच्या मागण्याचे निवेदन स्वीकारले या मागण्या निवेदन सरकारपर्यंत पोहोचू देऊ असे आश्वासन दिले व आंदोलन स्थगित करण्यासाठी विनंती केली.

आदिशक्ती महासंघ यांच्या वतीने एक दिवशीय उपोषण

या मोर्चाच्या वेळी इन्कलाब जिंदाबाद च्या घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी तिरंगा झेंडा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंह यासह अन्य प्रतिमा हातात घेऊन मोदी सरकार कि... हुकूमशाही... नही चलेगी... नही चलेगी... यासह अन्य घोषणा देत कराडकर लक्ष वेधून घेत हा मोर्चा तहसील कार्यालयासमोर विद्यार्थ्यांनी रस्त्यावरती ठिय्या आंदोलन केले

साई ट्रस्ट विद्यालयात रंगला भक्तीचा मळा



तालुका प्रतिनिधी /विठ्ठल ममतावादे
उरण : साई ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली साई ट्रस्ट जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयात आषाढी एकादशीचा सोहळा मोठया भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात शाळेच्या सुमारे अकराशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी सलवार कुर्ता आणि विद्यार्थिनींनी नऊवारी साडी परिधान केले होती आणि हातात भगवे झेंडे घेतले होते. विठू नामाच्या गजरात टाऊनशिपमध्ये विद्यार्थ्यांच्या घोषणांनी सर्वत्रचैतन्य भरले होते. संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते.यावेळी जे एन पी ए चे अधिकारी वर्ग उपस्थित होते त्यामध्ये सयाजीराव साळुंखे मॅनेजर इस्टेट जे एन पी ए, प्रवीण पाटील लेबर वेल्फेअर ऑफिसर जे एन पी ए आणि संदीप घरत मॅनेजर जे एन पी ए यांनी सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे प्रशासकीय अधिकारी रमाकांत गावंड, माध्यमिक मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील , बालोद्यान विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली बोरचटे, माध्यमिक इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक भूषण जाधव, आणि अंकुश जोगळे यांनी केले.सुरुवातीला शाळेचे आदर्श पिटी शिक्षक मनोहर टेमकर यांनी सर्व प्रमुख मान्यवरांचे महाराष्ट्राचे पारंपारिक नृत्य लेझीमच्या गजरात स्वागत केले. यानंतर रिंगण सोहळा संपन्न झाला. यावेळी शाळेचे संगीत शिक्षक पंडित गणेश बंडा यांनी आणि विद्यार्थ्यांनी भजन केले.दिंडी शिस्त आणि फलक लेखन कलाशिक्षक मिलिंद ठाकूर यांनी उत्तमप्रकारे केले.या रिंगण सोहळ्यात सर्व मान्यवरांनी सहभाग घेतला. जे एन पी ए चे उपस्थित सर्व अधिकारी विद्यार्थ्यांसोबत नृत्याच्या भक्तीरसात दंग झाले. प्रमुख पाहुण्यांनी फुगडी देखील घातली. यानंतर सर्व प्रमुख मान्यवरांनी श्री विठ्ठलाची मनोभावे पूजा केली. यावेळी साईट ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील सर यांनी सर्व मान्यवरांचे झाडाचे रोप देऊन स्वागत केले. यावेळी सयाजीराव साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेने आषाढी एकादशीची दिंडी काढताना पर्यावरणाचा संदेश दिल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांनी एक तरी झाड लावले पाहिजे आणि ते जगविले पाहिजे असे आवाहन केले. तसेच इयत्ता दहावी आणि स्कॉलरशिप परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करावे असे आवाहनही त्यांनी केले.यावेळी साई ट्रस्टचे अध्यक्ष नरसू पाटील सर यांनी शाळेच्या इतिहासात अशाप्रकारे प्रथमच भव्य दिव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले असे म्हटले. तसेच तसेच मराठी माध्यमाचा निकाल गेली अनेक वर्ष सातत्याने १००३ लागत आहे. तसेच तालुक्यातील मराठी माध्यमात पहिले चार विद्यार्थी

कंधार तालुक्यात जनावर चोरांची दहशत..! आठवडाभरात सहा बैलजोड्या चोरीला; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

कंधार । संतोष कांबळे
कंधार तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून जनावर चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने शेतकरी वर्गात भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः बैलजोड्या चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, शेतीची कामेही विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या घटनांमुळे ग्रामीण भागात जनावर चोरट्यांची संघटित टोळी सक्रिय असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

कंधार तालुक्यातील देवईचीवाडी येथील शेतकरी शिवाजी नागोराव केंद्रे यांच्या गोठ्यातून १९ जुलै रोजी अज्ञात चोरट्यांनी एक बैलजोडी चोरून नेल्याची घटना घडली. चोरीस गेलेल्या बैलजोडीची किंमत सुमारे ८० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस विविध अंगांनी तपास करत आहेत.

दरम्यान, गत आठवडाभरात कंधार तालुक्यातील विविध गावांतून तब्बल सहा बैलजोड्या चोरीला गेल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे जनावर चोरट्यांची टोळी तालुक्यात सक्रिय असल्याचा संशय अधिकच जोर धरला आहे. अनेक शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी गोठ्यांवर पहारा देण्यास सुरुवात केली असून, गावपातळीवरही दक्षता वाढविण्यात येत आहे. शेतकऱ्यांचे प्रमुख शेतीकाम बैलांवर अवलंबून असल्याने अशा चोरीच्या घटनांमुळे त्यांच्यासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहत आहे. एका बैलजोडीची किंमत लाखाच्या घरात पोहोचत असल्याने ती चोरीला गेल्यास शेतकऱ्याला मोठा फटका बसतो. त्यामुळे या घटनांकडे गांभीर्याने पाहून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी व नागरिकांकडून होत आहे.

ग्रामीण भागात रात्रीच्या गस्तीत वाढ करावी, संशयित वाहनांची तपासणी करावी तसेच जनावर चोरीच्या घटनांचा जलद तपास करून आरोपींना अटक करावी, अशी मागणीही नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. जनावर चोरांच्या वाढत्या धाडसामुळे संपूर्ण कंधार तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले असून, पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

साऊ फाउंडेशनच्या 'यूपीएससी सुपर-४०'च्या तिसऱ्या बॅचचा उत्साहात शुभारंभ



पुणे : पुणे, दि. २५ जुलै : साऊ फाउंडेशन व जनसेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी पुणे येथे राबविण्यात येत असलेल्या विनामूल्य 'यूपीएससी सुपर-४०' प्रशिक्षण प्रकल्पाच्या २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील तिसऱ्या बॅचचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत २० विद्यार्थी व २० विद्यार्थिनी अशा एकूण ४० विद्यार्थ्यांना मोफत यूपीएससी प्रशिक्षण दिले जात आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून महाराष्ट्र राज्य समाज कल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे (भा.प्र.से.) उपस्थित होत्या. विशेष उपस्थिती म्हणून पुणे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना दीपा मुधोळ-मुंडे यांनी समाजोपयोगी आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याला दिशा देणाऱ्या या उपक्रमाची सुरुवात केल्याबद्दल साऊ फाउंडेशनचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम व सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर यूपीएससी परीक्षेत यश मिळवून प्रशासकीय अधिकारी व्हावे आणि समाजातील तळागाळातील वंचित घटकांसाठी संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच यूपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासाचे नियोजन, सातत्य आणि योग्य पद्धतीने अभ्यास कसा करावा, याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा अंगीकार करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले.

साऊ फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सचिन शिंदे यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून भविष्यातही समाजातील तळागाळातील घटकांसाठी विविध उपक्रम राबवून समाजउन्नतीचे कार्य अधिक व्यापक करण्याची ग्वाही दिली. जनसेवा फाउंडेशनच्या ट्रस्टी केतकी देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत जनसेवा फाउंडेशन विद्यार्थ्यांच्या पाठीशी सदैव उभे राहील, असे आश्वासन दिले.

यावेळी साऊ फाउंडेशनचे संचालक तथा यूपीएससी कोर्स डायरेक्टर अमृत साळुंखे, गुणवंत सावळजकर, संचालक संदीप कांबळे, विद्यार्थी, पालक तसेच फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.

इंडियन मिलिटरी स्कुल मध्ये कारगिल विजय दिवस साजरा

विरूळ आकाजी : स्थानिक इंडियन मिलिटरी स्कुल येथील एन सी सी युनिट द्वारा कारगिल विजय दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला..

या प्रसंगी असोसिएट एन सी सी अधिकारी प्रवीण रोडके यांनी युवा छात्र सैनिकांना सैनिकांनी कशाप्रकारे अतिशय विपरीत परिस्थितीत कारगिल आणि द्रास सेक्टर मध्ये पाकिस्तानी अतेरीक्यांना खदेडून लावत ऑपरेशन विजय यशस्वी केले यावद्दल मार्गदर्शन केले..प्रा. प्रवीण रोडके यांनी युवा छात्र सैनिकांना भारतीय सैनिकांनी सन १९१९ च्या कारगिल युद्धात मायनस २० डिग्री सेल्सिअस तापमानात मध्ये दाखविलेल्या अदभूत साहसाचा परिचय करून दिला.. यावेळी ज्या भारतीय सैनिकांनी कारगिल युद्धात लढतांना सर्वोच्च बलिदान दिले, त्यांना मौन श्रद्धांजली अर्पण करण्यात आली..याप्रसंगी सार्जंट ध्रुव चकोले, कारपोरल अक्षद सानप, आर्यन केसकर, रिंकेश मानकर यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी भविष्यात भारतीय सैन्यदलामध्ये दाखल होऊन देशसेवा करण्याचा संकल्प व्यक्त केला..



कर्जमुक्तीने १५५ शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान



कवठे येमाई, प्रतिनिधी / धनंजय साळवे
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत कवठे विविध सहकारी सोसायटीच्या १५५ पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, सोसायटीच्या वतीने सर्व पात्र शेतकऱ्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

यावेळी शिरूर पंचायत समितीचे माजी सदस्य डॉ. सुभाष पोकळे, सोसायटीचे चेअरमन रितेश शहा, राजेंद्र चाटे, विक्रम इचके, हौशीराम मुखेकर, उत्तम जाधव, अर्जुन शिंदे, शुभम सावंत, लंघे यांच्यासह सोसायटीचे सर्व संचालक व पदाधिकारी उपस्थित होते.मान्यवरांनी लाभार्थी शेतकऱ्यांना शुभेच्छा देत शासनाच्या विविध कृषी व शेतकरी कल्याणकारी योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन केले. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्यांना नव्या जोमाने शेती करण्यासाठी आर्थिक बळ मिळणार असल्याचे मतही उपस्थितांनी व्यक्त केले.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी शासनाच्या या लोकाभिमुख निर्णयाबद्दल समाधान व्यक्त करत, अशाच कल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

चिमुकल्या वारकऱ्यांनी जिंकली उपस्थितांची मने; टाळ-मृदुंगाच्या निनादात दुमदुमला सार्थक स्कूलचा परिसर

जिल्हा प्रतिनिधी / विवेकानंद फंड
पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, वाचन, संस्कार आणि वारकरी परंपरेची ओळख विद्यार्थ्यांना बालवयातच व्हावी या उद्देशाने वडनेर खुर्द येथील सार्थक प्री प्रायमरी स्कूलने आयोजित केलेला ग्रंथ दिंडी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याला पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवत स्कूलच्या संस्कारक्षम शिक्षणाच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

ग्रंथ दिंडीमध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेशभूषा परिधान करून वारकरी संप्रदायाची संस्कृती जिवंत केली. यावेळी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशातील विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि भगव्या पताकांच्या साक्षीने निघालेल्या दिंडीने उपस्थितांना पंढरपूरच्या वारीचा अनुभव दिला. 'जय हरी विठ्ठल'च्या नामघोषाने परिसर भक्तिमय झाला.यावेळी विद्यार्थी व पालकांनी एकत्रितपणे फुगडी खेळत आनंदोत्सव साजरा केला. माता-पालकांसाठी आयोजित पैठणीच्या खेळाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सौ. जना सुनिल निचित यांनी पैठणी जिंकत विजेतेपद पटकाविले. कार्यक्रमाच्या शेवटी माजी सरपंच निवृत्ती सखाराम निचित यांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. संस्कार, संस्कृती आणि शिक्षणाचा त्रिवेणी संगम घडविणारा हा सोहळा उपस्थितांच्या कायम स्मरणात राहील अशी भावना यावेळी पालकांनी व्यक्त केली. शिक्षणासोबतच संस्काराची पेरणी करणाऱ्या सार्थक प्री प्रायमरी स्कूलच्या या अभिनव उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.



आंतरजातीय विवाह काळाची गरज !



सातारा : सर्वधर्मसमभाव ही संकल्पना सत्यात राबविणे, तसेच समाजात कोणत्याही प्रकारचा भेदभाव राहू नये. यासाठीच आंतरजातीय विवाह करणे ही काळाचीच गरज आहे.

भारतीय बौद्ध महासभेचे माजी राष्ट्रीय सचिव नाथा ममता आगाणे (काका) यांचे चि. अजित यांचा विवाह रोहिणीवरोबर संपन्न झाला होता.त्या प्रित्यर्थ स्वागत समारंभ शिरसाट कॉलनी, पाटण येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.तेव्हा वरीलप्रमाणे मान्यवरांनी भावना व्यक्त केल्या.

प्रथमतः मान्यवरांचा सत्कार व स्वागत काका यांनी केले. यावेळी नववधूवर यांना शुभाशीर्वाद देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब जगताप, आनंदराव कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष घन:श्याम कांबळे,कोषाध्यक्ष आनंदा गुजर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत, सरचिटणीस गणेश कारंडे, बौद्धाचार्य अजित कांबळे, अनिल वीर आदी विविध क्षेत्रातील मान्यवर,कार्यकर्ते, नातेवाईक,उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.सरतेशेवटी स्नेहभोजनांनी सांगता करण्यात आली.

न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त भव्य दिंडी सोहळा उत्साहात

वृक्षदिंडी व ग्रंथदिंडी; पर्यावरण संवर्धन व वाचन संस्कृतीचा दिला संदेश

सातारा/डॉ जीवन मोहिते
श्री समर्थ एज्युकेशन सोसायटी सोनवडी गजवडी संचलित न्यू इंग्लिश स्कूल पिलाणी मजरे ता.जि सातारा येथे दिंडी सोहळा नुकताच उत्साहात पार पडला

: महाराष्ट्रात आषाढी वारीमुळे सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून या उत्साहात न्यू इंग्लिश स्कूल, पिलाणी येथील विद्यार्थ्यांनी अनोख्या पद्धतीने वृक्षदिंडी आणि ग्रंथदिंडीचे आयोजन करून पर्यावरण संवर्धन व वाचन संस्कृतीचा प्रभावी संदेश दिला.

शालेय विद्यार्थ्यांना आपल्या संत परंपरेची, संस्कृतीची ओळख व्हावी तसेच पर्यावरण संवर्धन आणि वाचनाचे महत्त्व समजावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. दिंडीत विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून हातात टाळ, गळ्यात पखवाज घेत विठ्ठलनामाचा गजर करत गावातून दिंडी काढली. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीचे आकर्षक रूप साकारत खांद्यावर पालखी घेतली होती. दिंडीदरम्यान विद्यार्थ्यांनी पारंपरिक गोल रिंगण साकारून उपस्थितांची मने जिंकली.

पर्यावरण जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी हातात विविध प्रकारची रोपे, पर्यावरण संरक्षणाचे संदेश देणारे फलक आणि घोषवाक्ये घेत गावातील प्रमुख मार्गावरून जनजागृती फेरी काढली. 'झाडे लावा, झाडे जगवा', 'वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा', 'एक विद्यार्थी – एक वृक्ष' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना वृक्षारोपणासह लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचे आवाहन केले.

यावेळी ग्रंथदिंडीच्या माध्यमातून वाचन संस्कृतीचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध ग्रंथांची पालखी सजवून ज्ञान, संस्कार आणि वाचनाची आवड जोपासण्याचा संदेश दिला.

या उपक्रमात शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. दिंडीनंतर शाळा परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचे संरक्षण आणि हरित भविष्यासाठी प्रत्येकाने वृक्ष लागवड करून त्यांचे जतन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असा संदेश यावेळी देण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे, वाचन संस्कृतीला चालना देणे आणि संत परंपरेचे संस्कार रुजविणे या त्रिसूत्री उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक ग्रामस्थ मनापासून कौतुक केले.

नागपूरच्या सुनियोजित विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

सफाई कामगारांसह ५७९ उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वाटप; आपली बससाठी व्हॉट्स ?प तिकीट प्रणालीचा शुभारंभ

नागपूर : जागतिक बँकेच्या अहवालानुसार येत्या दहा वर्षात नागपूर शहर जलदगतीने विकसित होत असून पायाभूत सुविधांच्या विकासामुळे शहराचा चेहरा बदलत आहे. एक वैश्विक शहर नवी ओळख निर्माण होत असल्यामुळे शहराच्या सुनियोजित विकासासाठी निधी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

महानगरपालिकेच्या हिरवळीवर आयोजित विशेष समारंभात शहरातील ४७६ सफाई कामगारांना कायम नियुक्तीपत्र तसेच सरळसेवा भरतीने १०३ युवकांना नियुक्तीपत्राचे वाटप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी होते.

यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री मोहन मते, कृष्णा खोपडे, उपमहापौर लिला हाथीबेड, राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष शेरसिंह डागोर, स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवानी दाणी, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त मुरगनाथन एम., श्री. अंकित आदी अधिकारी तसेच विविध समित्यांचे सभापती, पदाधिकारी व नगरसेवक यावेळी उपस्थित होते.

शहर स्वच्छ व सुंदर राहिल्यास त्याचा सार्वजनिक आरोग्यावरही परिणाम होतो. स्वच्छतादूतांचा आस्थापना खर्च जास्त असल्यामुळे नियुक्तीसाठी विशेष सूट देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात भरती झाल्याचे सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार ४७६ स्वच्छतादूतांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहेत. या समितीने सेवाविषयक बाबींचा अहवालानुसार शासन निर्णय निघूनही भरती होत नव्हती. या अहवालाच्या अंमलबजावणीला प्राधान्य दिल्यामुळे सफाई कामगारांचे विविध प्रश्न सोडविण्यात आल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

स्वच्छता कर्मचाऱ्यांना नागपूर महानगरपालिकेने नियुक्तीपत्रे देण्यासोबतच त्यांच्यासाठी मोफत घरकुल देण्याची



योजना राज्यात सर्वात प्रथम राबविली आहे. ३०० चौरस फुटांच्या मोफत घरांसोबतच अधिकच्या बांधकामासाठी अतिरिक्त शुल्क भरल्यास मोठे घर देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे यावेळी सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, शहर स्वच्छ राहावे, आरोग्य चांगले राहावे, यासोबतच स्वच्छता दूतांच्या जीवनात परिवर्तन सुद्धा घडविण्यासाठी विशेष योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी जाहिर केले.

नागपूर शहराचा वेगाने होत असलेला विकास व त्यासोबतच पायाभूत सुविधा, उंच इमारती यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन महानगरपालिकेने स्वच्छतेच्या दृष्टीने प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी सफाई कामगारांच्या पाल्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

महानगरपालिकेच्या ऐतिहासिक हिरवळीवर राष्ट्रपतींसह अनेक मान्यवर व कलावंतांचे सत्कार समारंभ येथे आयोजित करण्यात आले आहेत. ही हिरवळ म्हणजे महानगरपालिकेच्या इतिहासाची साक्ष आहे. महापौर म्हणून व त्यापूर्वीही अनेक समारंभांना उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा कार्यक्रम हिरवळीवरच आयोजित करावा, अशी सूचना केली होती. त्याअनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याचे तसेच येथील कार्यक्रमांच्या स्मृतींना यावेळी मुख्यमंत्र्यांनी उजाळा दिला.

अध्यक्षीय भाषणात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, शहराच्या विकासासोबतच स्वच्छता, खेळाचे मैदान व नागरिकांसाठी मुलभूत सुविधांचा विकास करताना येथील स्वच्छतेला प्राधान्य देण्याची आवश्यकता व्यक्त केली. नवनियुक्त कर्मचाऱ्यांना पारदर्शक व गतीमान प्रशासन देण्याची आवश्यकता व्यक्त करताना प्रत्येक प्रभागामध्ये खेळाची मैदाने २४ तास पाणीपुरवठा तसेच बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

प्रारंभी महापौर नीता ठाकरे यांनी स्वागत करून प्रास्ताविकामध्ये शहराच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या स्वच्छतादुतांच्या नियुक्त्यांसाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस व केंद्रीय मंत्री गडकरी यांचे आभार मानले. आपली बस ही सेवा अधिक लोकाभिमुख व्हावी, यादृष्टीने व्हॉट्स ?पद्वारे बसचे तिकीट देण्याचा शुभारंभ होत असल्यामुळे शहर अधिक स्मार्ट होणार असून स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. उपमहापौर लिना हाथीबेड यांनी आभार मानले. मनिष सोनी यांनी सूत्रसंचालन केले.

खासदारांन मार्फत रेल्वे मंत्री वैश्णव यांना सिंदी येथे थांबण्यासाठी निवेदन

युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिवाची पहल

सेलू/ प्रशांत झाडे

सिंदी रेल्वे येथील कोराणा काळात बंद केलेले रेल्वे गाड्यांचे थांबे पुर्ववत सुरु करण्याच्या अनेक दिवसांच्या सिंदीवासीयांच्या मागणीचे केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनजी वैश्णव यांना जिल्ह्याचे खासदार अमर काळे यांच्या मार्फत रविवारी (ता.१९) ला युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव अफजल बेरा यांनी नव्याने निवेदन देत साकडे घातले आहे.

कोरोना काळापूर्वी सिंदी रेल्वे स्थानकावर थांबणाऱ्या सर्व एक्सप्रेस रेल्वे गाड्यांचे थांबे पूर्ववत सुरू करण्यात यावेत, या प्रमुख मागणीचे निवेदन माननीय केंद्रीय रेल्वेमंत्री मा. श्री. अश्विन वैष्णव यांच्यापर्यंत पोहोचविण्याची तसेच संसदेत व रेल्वे मंत्रालयाकडे हा जनहिताचा विषय प्रभावीपणे मांडण्याची विनंती करण्यात आली.



सिंदी परिसरातील विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी, कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि हजारो रेल्वे प्रवाशांच्या दैनंदिन प्रवासासाठी ही मागणी अत्यंत महत्त्वाची आहे. सिंदीकरांच्या भावना लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेऊन कोरोना काळापूर्वीचे सर्व रेल्वे थांबे पूर्ववत सुरू करावेत, हीच सर्व सिंदीकरांची अपेक्षा असलेल्याचे या निवेदनात विशद करण्यात आले.

न्यू एरा हॉस्पिटलचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

नागपूर : रामदासपेठ येथील न्यू एरा हॉस्पिटलचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज सायंकाळी झाले. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



पगारिया समूह आणि प्रेमजी इन्व्हेस्ट यांच्या पाठबळावर उभारलेली ही आरोग्यसंस्था आहे. उत्कृष्ट वैद्यकीय सेवा, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि रुग्णांविषयी करुणाभाव या तत्त्वांवर आधारित न्यू एरा हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर आणि जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकाच छताखाली सर्वसमावेशक, रुग्णकेंद्रित आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने हे रुग्णालय उभारण्यात आले असून, प्रगत निदान सेवा, अतिदक्षता विभाग, आपत्कालीन सेवा, अवयव प्रत्यारोपण, न्यूरोसायन्सेस, माता व बाल आरोग्य सेवा, रोबोटिक शस्त्रक्रिया तसेच विविध सुपर स्पेशालिटी सेवा येथे उपलब्ध असतील. मुख्यमंत्री फडणवीस यांनी येथील आरोग्य सुविधांची पाहणी करून रुग्णालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या रुग्णालयाच्या माध्यमातून प्रदेशातील दर्जेदार आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. या उद्घाटन सोहळ्याला नामवंत डॉक्टर, आरोग्य क्षेत्रातील नामवंत, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

आरोग्यसेवा, वैद्यकीय नवोपक्रम आणि संस्थात्मक उत्कृष्टतेसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवर वैद्यकीय तज्ज्ञ आणि धोरणात्मक भागीदारांचा याप्रसंगी गौरव करण्यात आला. यामध्ये पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. निधीश मिश्रा, डॉ. निलेश अग्रवाल, डॉ. राहुल सक्सेना, डॉ. आनंद भुतडा, डॉ. अतिश बाकणे, डॉ. अलंकार रामटेके यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश होता.

श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान, विरुळ (आ.) येथे आषाढी एकादशी उत्साहात साजरी

गौरेश बकाने यांच्या

विरुळ (आकाजी.) : श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान, विरुळ आकाजी येथे दिनांक २५ जुलै २०२६ रोजी आषाढी एकादशीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.



यावेळी मंदिरात मोठ्या संख्येने भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणींचे दर्शन घेतले. मंदिरात भजन, पूजा-अर्चा व आरती करण्यात आली. त्यानंतर गावातून भव्य पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. या पालखी शोभायात्रेत गावातील सर्व भजनी मंडळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

पालखी सोहळ्यादरम्यान गावातील विविध ठिकाणी भाविकांसाठी चहा व फराळाची व्यवस्था करण्यात आली होती. शेकडो भाविकांच्या उपस्थितीत पालखीने गावातील श्री आबाजी महाराज मंदिर, श्री हनुमान मंदिर, अंबादेवी माता मंदिर, एकवीरा माता मंदिर, मुरलीधर मंदिर व भवानी माता मंदिर येथे जाऊन पूजा-अर्चा केली.

पालखी सोहळ्याच्या निमित्ताने गावातील विविध रस्त्यांवर सुंदर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. पालखी आपल्या घरासमोरून जात असताना भाविकांनी पालखीचे पूजन करून भक्तिभाव व्यक्त केला.

शेवटी श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान येथे भजन व आरती करून पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानच्या वतीने उपवासाची चिक्की, फराळ व चहाची व्यवस्था करण्यात आली.

आषाढी एकादशीचा हा कार्यक्रम अत्यंत आनंदी, उत्साही व भक्तिमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील सर्व भाविक, भजनी मंडळे तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानचे विश्वस्त मंडळ यांनी मोलाचे सहकार्य केले.

विवेकानंद पब्लिक स्कूलमध्ये 'एक पेड माँ के नाम' वृक्षारोपण उपक्रम उत्साहात



नागपूर/ दिलीप येवले:

विवेकानंद पब्लिक स्कूल, बहादुरा येथे भारत स्काऊट्स अँड गाईड्सच्या उपक्रमांतर्गत 'एक पेड माँ के नाम' वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांनी वापरात नसलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा पुनर्वापर करून आकर्षक प्लांटर्स तयार केले व त्यामध्ये विविध रोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनासोबतच "ल्म, ले, म्ब्त' चा प्रभावी संदेश दिला. या अभियानाची प्रेरणा पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या 'एक पेड माँ के नाम' उपक्रमाशी सुसंगत आहे. यानंतर शाळेच्या मैदानात वैशाली कडू, वैशाली बावणकुळे, गाईड कॅप्टन जयश्री थूल व लेडी स्काऊट मास्टर श्रीमती विश्रांती गवई यांच्या उपस्थितीत स्काऊट्स व गाईड्स विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेल्या रोपाचे संगोपन करण्याचा संकल्पही केला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षण, सामाजिक जबाबदारी, सेवा आणि निसर्गप्रेमाची भावना दृढ झाली. विद्यालयाच्या व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कौतुक करत तो समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

समता कॉन्व्हेंट कचारी सावंगा येथे सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न

विद्यार्थ्यांचे आगमन वारकरी पोशाख, आषाढी एकादशी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन



काटोल/ प्रशांत पवार

आषाढी एकादशीनिमित्त समता कॉन्व्हेंट कचारी सावंगा येथे सकाळी वारकरी संप्रदायाच्या पोशाखामध्ये विद्यार्थ्यांनी शाळेत प्रवेश करून जय जय विठू माऊली च्या नामाने परिसर दणाणून सोडला तर विठ्ठल विठ्ठल विठ्ठला हरी ओम विठ्ठला च्या गाण्यावर टाळ व मृदुंग घेऊन नृत्य करण्यास सुरुवात केली. मराठी संस्कृतीचे जडणघडण होऊन विद्यार्थ्यांमध्ये आपल्या मराठी संस्कृतीची ओळख निर्माण व्हावी याकरिता समता कॉन्व्हेंट दरवर्षी अशा प्रकारचे कार्यक्रम राबवीत असतात कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या पालकांनी वारकरी संप्रदायाची वेशभूषा साठी विशेष प्रयत्न केले होते तर कॉन्व्हेंट च्या टीचर मंजुषा भेलकर व गौरी उमप यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रम यशस्वी करणारे विद्यार्थी त्यांचे पालक व टीचर यांचे आभार शाळेच्या संचालकांनी केले.

'आषाढी एकादशी निमित्ताने ब्रह्माकुमारीज् सेलू च्या वतीने फळांचा वाटप'



सेलू / प्रशांत झाडे

आषाढी एकादशी हा दिवस भक्ती भावनेचा व हरी नामात दंग होण्याचा या पावन दिवसाचे अवचित्य साधून, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविज्ञालय, सेलू च्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान, प्रति पंढरपूर घोराड येथे केळी तसेच आदी फळांचा वाटप करीत भावीक भक्तांना परमेश्वराचा संदेश देण्याचा पर्यन्त करण्यात आला.

सदर आयोजन ब्रह्माकुमारीज् सेलू च्या संचालिका दर्शना दिदी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली करण्यात आले या प्रसंगी ब्रह्माकुमारीज् वर्धा च्या संचालिका माधुरी दिदी, मधुदिदी या प्रामुख्याने उपस्थित होत्या. सदर स्टॉल ला वर्धा सोशल फोरम चे अध्यक्ष अभ्युदय जी मेघे, बीजेपी चे तालुका अध्यक्ष प्रफुल भाऊ खोडे यांनी विशेष भेट दिली. भाविकांनी मोठ्या संख्येने याचा लाभ घेतला.

यशवंत महाविद्यालय सेलू येथे राबविला पोलीस-काका, पोलीस दिदि उपक्रम

अमली पदार्थांच्या सेवनाने शरीरावर दुष्परिणाम सेलूचे ठाणेदार पंकज वाघोडे यांचे प्रतिपादन

सेलू/ प्रशांत झाडे

पोलीस अधीक्षक कार्यालय वर्धा यांच्या वतीने सेलू पोलिस स्टेशन अंतर्गत यशवंत महाविद्यालय सेलू येथे पोलीस काका, पोलीस दीदी उपक्रम राबविण्यात आला.

. यशवंत महाविद्यालय सेलू येथे पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधिशक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी वर्धा सुनिल महाडिक यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयाचे प्राचार्य संदिप काळे यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस काका - पोलीसदिदि या कार्यक्रमाला सेलूचे ठाणेदार पंकज वाघोडे, पोलीस उपनिरिक्षक विशाल नल्लावर , महिला अंमलदार सोनाली मेसरे, पोलीस अंमलदार तुषार भुते, मंगेश राऊत ,सुनिल चावरे यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला लाभलेल्या सेलू पोलिस स्टेशन पथकांनी व प्राचार्य यांच्या हस्ते सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सेलूचे ठाणेदार पंकज वाघोडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे, लहान मुले बालकांवर त्याच्यावर होणारे पोसको कायद्याप्रमाणे दाखल गुन्हे , डायल ११२ या क्रमांकावर संकट समयी कॉल करण्याबाबत व महिलां वरील अत्याचाराबाबत गुन्हे, बालकांची काळजी व संरक्षण तसेच वाहतुकीचे, बालका वरील लैंगिक अत्याचार,नियम आदी बाबत माहिती देण्यात आली. परिसरात घडणाऱ्या गुन्हया बाबत विद्यार्थ्यांनी सतर्क राहावे असे आवाहन करण्यात आले.तसेच पोलीस उपनिरिक्षक विशाल नल्लावर, महिला अंमलदार सोनाली भुते, राऊत ,चावरे यांनी बालकावरिल अत्याचार गुड टच ्टच, सायबर म्स, सुरक्षा १९३० व चाईल्ड हेल्पलाईन नं.१०९८ वर काल करुन मदत घेवू शकता. या विविध विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळि महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी सेलू पोलीस स्टेशन पथकाने या उपक्रमातुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अर्चना फाळके तसेच या कार्यक्रमाला विद्यार्थी ,शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

अमली पदार्थ सुरवातीला क्षणिक आनंद देतात

अमली पदार्थ मानवी शरीरात गेल्यानंतर मेंदू मज्जा संस्थेवर परिणाम करतात.त्यामुळे व्यक्तीच्या विचार भावना, वागणूकीत बदल जानवतो अमली पदार्थांच्या सेवनाने व्यक्तीला तात्पुरता आनंद मिळतो पण त्याचे दुष्परिणाम खुप गंभीर असु शकतात पैशै कमविण्यासाठी ड्रग्स माफिया जास्तीत जास्त किशोरवयीन मुलांना टार्गेट करून त्यांना सवय लावतात. अमली पदार्थ सुरवातीला क्षणिक आनंद देतात पण त्याचे वाईट परिणाम आयुष्यभर भोगावे लागतात.

आषाढी वारीत ७.४७ लाखांहून अधिक वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारी २०२६ दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाने वारकरी भाविकांना व्यापक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत ७ लाख ४७ हजार १७८ वारकरी भाविकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली असून, विविध आजारांवरील तपासणी व उपचारांमुळे हजारो वारकऱ्यांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळाली.

पंढरपूर कॉरिडॉरचे काम कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन करून पूर्ण करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचे काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. कोणावरही अन्याय न करता सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी बाबासाहेब माधव माने, प्रभावती बाबासाहेब माने या दाम्पत्यासमवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस.



कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशाल जैन, मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

मागील काळात सुरू केलेले मंदिर विकासाचे काम बहुतांश पूर्ण झाले असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, 'पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येथे अत्यंत कमी जागा आहे. आता मोठी जागा तयार करणे गरजेचे आहे. यावर्षी हे काम सुरू करायचे आहे. कॉरिडॉर विकासात येथील व्यावसायिकांचा व्यवसाय वाढेल, नागरिकांना घरे मिळतील, भाडेकरूंची व्यवस्था होईल, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कितीही भाविक आले तरी अतिशय उत्तम व्यवस्था या ठिकाणी होईल.'

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, 'यावेळी वारीने एक नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षी २५ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची दर्शनासाठी रांग लागली होती. परंतु दर्शनासाठी २५ तास लागले तरीही कोणीही नाराज न होता, न थकता त्या ठिकाणी आनंदाने विठ्ठल नामाचा गजर करत हे दर्शन घेत आहेत. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील याची काळजी घेण्यात आली आहे. यावेळी पालकमंत्र्यांनी वाळवंटात अतिशय सुंदर व्यवस्था केल्यामुळे तिथला कचरा, विष्ठा आदी संपूर्ण स्वच्छता झाली आहे. त्यामुळे अतिशय सुंदर वाळवंट आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. आपण सर्वजण करत असलेली सेवा श्री विठ्ठल स्वीकारतील आणि त्यांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सदैव मिळेल, अशी प्रार्थना मी त्यांच्या चरणी करतो.'

'लाखो भक्त विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघतात. अनेक वारकरी कळसाच्या दर्शनावरच समाधान मानतात. जणू काही विठुरायाचीच भेट झाली आहे, अशा भावनेने लोक जातात. या अनोख्या सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणे, ही देखील एक पर्वणी आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आपला प्रतिनिधी म्हणून केलेली ही पूजा संपूर्ण महाराष्ट्रातील आणि जगभरातील पांडुरंगाच्या भक्तांच्या वतीने केलेली पूजा आहे,' असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, 'येणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, उद्योजक अशा सर्व क्षेत्रातील आहे. विठुरायाची सेवा जरी आपल्याला करता आली नाही, तरी वारकऱ्यांची, शेतकऱ्यांची सेवा केली तरी ती सेवा विठुरायापर्यंत पोहोचते. त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडावे, यासाठी ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय आणि थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.'

प्रारंभी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रास्ताविक केले. 'श्री विठ्ठल मंदिराला पाठबळ देणे, निधी देणे आणि विकास करण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. आज विठुमाऊलीच्या दर्शनासाठीच्या रांगेचे अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले आहे. दर्शन रांगेत ५० ते ६० हजार वारकरी असले तरी पालकमंत्र्यांनी राज्य शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या सुविधा केल्यामुळे दर्शन सुसह्य झाले आहे,' असे ते म्हणाले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी म्हणून मु.पो. गौरगाव, ता. कळंब, जि. धाराशिव येथील बाबासाहेब माधव माने आणि सौ. प्रभावती माने या दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते महापूजेनंतर सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना वर्षभर मोफत एसटी प्रवास पास वितरित करण्यात आला.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्कार वितरण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाणी, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन आदी विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांना 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौडण्यपूर, द्वितीय क्रमांक वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, जालना आणि तृतीय क्रमांक गोऱ्हेकर संस्था, आळंदी देवाची यांना पुरस्कार व धनादेश देण्यात आला.

आठ महिन्यांपासून पगार नाही साहेब जगावं कसं ?

पाणी व स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांचे २३ जुलै पासून बेमुदत काम बंद आंदोलन



वर्धा : पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जिल्हास्तर व तालुकास्तरावर कार्यरत जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन मधील कर्मचाऱ्यांचा मागील सुमारे आठ महिन्यांपासून पगार प्रलंबित असल्याने राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी दि. २३ जुलैपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. पगाराची रक्कम राज्यस्तरावर उपलब्ध होवूनही संबंधित विभागाच्या नाकर्तेपणामुळे कार्यवाही होत नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांनी पगार खात्यावर जमा होईपर्यंत काम बंद आंदोलन सुरू केले आहे. अशी माहिती पाणीपुरवठा स्वच्छता विभाग शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड यांनी दिली.

शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनात महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हास्तरावर कार्यरत कर्मचारी सहभागी झाले आहेत. वर्धा जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत कर्मचारीदेखील या आंदोलनात सक्रियपणे सहभागी झाले असून, पगार मिळेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, अनेक कर्मचाऱ्यांवर कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, घरभाडे तसेच बँक कर्जाचे हप्ते यांचा मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. आठ महिन्यांपासून पगार न मिळाल्याने अनेक कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून, शासनाने तातडीने याची दखल घेण्याची मागणी करण्यात येत आहे.

आंदोलनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत

जल जीवन मिशन अंतर्गत प्रलंबित आठ महिन्यांचा व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्रलंबित सहा महिन्यांचा पगार तात्काळ अदा करावा.

राज्यस्तरावरील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा सरळ सरळ हा जिल्हास्तर व तालुका स्तरावरील कर्मचारी यांना त्रास देण्याचा प्रकार आहे. राज्यस्तरावर निधी उपलब्ध होऊनही पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नाकर्तेपणामुळे सदर कर्मचाऱ्यांना आठ महिने उलटून जाऊनही पगार मिळत नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. याबाबत कृती समितीमार्फत विभागाला विचारणा केली असता त्यांना वेळोवेळी वेगवेगळी उडवाउडवी चे उत्तरे दिली जात आहेत. ही बाब नक्कीच विभागाला आणि या पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारी नाही. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात कार्यरत कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्राला देशात नावलौकिक मिळवून दिले ,आज त्यांच्यावरच उपासमारीची वेळ या अधिकाऱ्यांनी आणलेली आहे. हे नक्कीच हे कर्मचारी सहन करणार नाहीत.

रमाकांत गायकवाड,
अध्यक्ष पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समिती.

जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घ्यावे.

मार्च २०२७ पर्यंत पगाराचा निधी जिल्हास्तरावर उपलब्ध करून देणे.

वाघाचा मुक्तसंचार, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

- नागरिकांनी दक्षता बाळगण्याचे आवाहन

वर्धा : धामणगाव वाटोडा शिवारात वाघाचा संचार असल्याने नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले. या अनुषंगाने परिसरातील गावांत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी वनविभागाकडून विविध उपाययोजना करण्यासह दक्षता बाळगण्याचे सूचना नागरिकांना देण्यात येत आहे.

वाटोडा धामणगाव परिसरात वाघाचा मुक्त संचार होत असल्याचे निदर्शनास आले. याबाबत वनविभागाला माहिती देण्यात आली. माहिती मिळाल्यावर वनविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पाहणी केली. वाघाचा मुक्त संचार परिसरात होत असल्याने वाटोडा, धामणगाव तसेच परिसरातील गावातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

- नागरिकांनी रात्रीच्या वेळी शेतात जाताना समुहाने जावे. बॅटरी, टॉर्च, घुंगराची काठी बाळगावी. मोबाईलवर गाणे सुरू ठेवावे, सायंकाळच्या वेळेस घराच्या अंगणात किंवा परिसरात लहान मुलांना एकटे सोडू नये. दिवा सुरू ठेवावा, रात्रीला उघड्यावर झोपू नये. शिवाय उघड्यावर शौचास जाऊ नये. पाळीव जनावरे रात्रीच्या वेळेस गोठ्यात बांधावी. शिवाय गोठा सर्व बाजूने बंदिस्त राहील याची दक्षता घ्यावी. शेतात विद्युत प्रवाह सोडू नये आदी सूचना वनविभागाच्या वतीने देण्यात आल्या आहेत.

सलग दुसऱ्या वर्षी वारी सेवा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न

२० ते २४ जुलैदरम्यान सुमारे १५०० वारकऱ्यांना सेवा किट, तर आषाढी एकादशीला उसळ व ताक प्रसादाचे वाटप



वर्धा : समाजसेवा आणि वारकरी संप्रदायाच्या सेवाभावाची परंपरा जपत वर्धेतील युवक व युवतींनी आणि काही सामाजिक संस्थां यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला वारी सेवा उपक्रम यंदा सलग दुसऱ्या वर्षी अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमांतर्गत दि. २० ते २४ जुलै या चार दिवसांत वर्धा शहरातून पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी विशेष सेवा उपक्रम राबविण्यात आला. या कालावधीत सुमारे १५०० वारकऱ्यांना सेवा किटचे वाटप करण्यात आले. या सेवा किटमध्ये फराळी चिवडा, लाडू, बिस्किटे, चिक्की, आवश्यक औषधे तसेच प्रवासादरम्यान उपयोगी पडणाऱ्या इतर वस्तूंचा समावेश होता. या सेवेमुळे वारकऱ्यांच्या प्रवासाला आधार मिळाला असून त्यांनी आयोजकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

त्यानंतर आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, वर्धा येथे दर्शनासाठी आलेल्या वारकरी, भाविक व नागरिकांना उसळ आणि थंड ताकाचा प्रसाद वाटप करण्यात आला. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांनी या सेवाभावी उपक्रमाचे मनापासून स्वागत करत आयोजकांच्या कार्याचे कौतुक केले. या वारी साठी सर्व सदस्यांनी स्व खर्चातून ही जबाबदारी पार पाडली व काही समाजसेवक यांनी मदत केली. या वरिसेवा ला यशस्वी रित्या पार पडण्याकरिता वर्धा क्रांती मोहीम , शिवसंकल्प बहुउद्देशीय संस्था (वर्धा विभाग मोहीम समिती) , शिवस्वराज्य बहुउद्देशीय संस्था , जगदंब ढोल ताशा पथक समिती या संस्थेचा मोलाचा सहभाग लाभला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भविष्यातही अशाच सेवाभावी उपक्रमांद्वारे समाजहिताचे कार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला.

पाच महिन्यापासून पसार असलेला आरोपी देवळी पोलीसांच्या ताब्यात.!



गौळ (वार्ताहर) : देवळी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या भिडी येथील पाच महिन्यापासून पसार असलेल्या आरोपीवर देवळी पोलीसांनी पाळत ठेवुन त्याला अटक करण्यात आली आहे.

दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी भिडी येथील फिर्यादी पाडुरंग उत्तमराव डकरे यांना आरोपी राकेश वाघचा व त्याचे तिन साथीदार यांनी पकडुन त्यांनी सोबत आणलेल्या लाल रंगाच्या गाडीत टाकले व हाथावुक्क्यानी मारहाण केली. राकेश वाघचा यांने लाकडी काडीने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली व ३ लाख रूपये मागितल्याची घटना घडली होती. त्यासंदर्भात पोलीस स्टेशन देवळी येथे विविध कलमानुसार गुन्हा नोंद करण्यांत आला होता.

सदर गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेवुन लगेच योग्य दिशेने तपास करीत यातील अज्ञात आरोपीतांचा देवळी पोलीसांनी कसोसीने शोध घेवुन आरोपी राकेश वाघचाचे ३ साथीदार यास गुन्हयात अटक करण्यात आली होती. परंतु राकेश वाघचा हा मागील ५ महीण्यापासुन नागपुर, अमरावती, यवतमाळ, अशा विविध ठिकाणी फिरत राहत होता. देवळी पोलीसांनी त्याचेवर पाळत ठेवुन दिनांक २४ जुलै २०२६ रोजी अटक करून विद्यमान न्यायालयासमोर पेश करण्यात आले. विद्यमान न्यायालयने आरोपी राकेश हरीचंद्र वाघचा वय ३० वर्षा. भिडी ता. देवळी यास चार दिवसाची पोलीस कस्टडी दिली आहे.

सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन टोळयाने गावात फिरत असतो. त्याचेवर सरकारी कर्मचारी हल्ला, दुखापतीचे गुन्हे, तसेच दारूबंदीचे एकुण २३ गुन्हे दाखल आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक, सौरभकुमार अग्रवाल पोलीस अप्पर पोलीस अधीक्षक, सदाशिव वाघमारे सा., मा. सहा. पोलीस अधीक्षक, डॉ. वंदना कारखेले, उपविभागीय पोलीस उपविभाग पुलगाव, यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार संदीप कापडे, यांचे सह पोलीस उपनिरीक्षक शिवराज जाधव, पोलीस कर्मची दुर्गेश बानते गणेश पवार यांनी केली आहे. गुन्ह्यांचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवराज जाधव करीत आहेत.

न्यू मोन्फोर्ट फार्मसी महाविद्यालय प्रकरण: अभाविपचे दोन दिवसीय आंदोलन आमदार सुमित वानखडे यांच्या आश्वासनाने आंदोलनाला स्थगित

पुढील १० दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

आष्टी: न्यू मोन्फोर्ट फार्मसी महाविद्यालयातील एका विद्यार्थिनीची मूळ कागदपत्रे परत न करणे आणि कर्मचाऱ्याने केलेल्या गैरवर्तणुकीच्या विरोधात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) आष्टी शाखेच्या वतीने पुकारण्यात आलेले दोन दिवसीय आंदोलन आमदार सुमित वानखेडे यांच्या आश्वासनानंतर तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. मात्र, प्रशासनाने डपुढील १० दिवसांत या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई न केल्यास अभाविपतर्फे अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईलङ्घ, असा स्पष्ट आणि खणखणीत इशारा देण्यात आला आहे.

ङकाय आहे नेमके प्रकरण?ङ

महाविद्यालयातील मोहसीन खान या कर्मचाऱ्याने एका विद्यार्थिनीची मूळ कागदपत्रे अडडवून ठेवली होती. यासंदर्भात अभाविपच्या कार्यकर्त्यांनी त्याला जाब विचारला असता, त्याने अरेरावी करत अवाच्य भाषेचा वापर केला. याप्रकरणी १५ व १६ जुलै रोजी आष्टी पोलीस स्टेशन आणि एसडीपीओ चव्हाण मॅडम यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही कारवाई न झाल्याने अभाविपने २३ आणि २४ जुलै रोजी महाविद्यालयासमोर मोठे आंदोलन उभारले.

आमदारांचे आश्वासन आणि १० दिवसांचा अल्टिमेटम:

वाढता रोष आणि प्रशासनाची संथ भूमिका पाहता, २५ जुलै रोजी आमदार सुमित वानखेडे यांनी अभाविप प्रतिनिधी आणि विद्यार्थ्यांसोबत सविस्तर चर्चा केली. यावेळी आमदारांनी 'एक समिती नेमून सखोल चौकशी केली जाईल व दोषींवर कठोर कारवाई केली जाईल' अशी शाश्वती दिली. या आश्वासनाचा आदर राखत अभाविपने हे आंदोलन सध्या स्थगित केले आहे.

परंतु, अभाविपने प्रशासनाला डपुढील १० दिवसांची मुदतङ्घ दिली आहे. जर या १० दिवसांच्या आत न्यू मोन्फोर्ट फार्मसी महाविद्यालयाचे संस्थाचालक मोहसीन खान यांच्यावर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई झाली नाही, तर विद्यार्थी हितासाठी अभाविप पुन्हा रस्त्यावर उतरेल आणि याहून अधिक तीव्र आंदोलन करेल.



विविध स्तरांवर पाठपुरावा: या न्याय्य हक्काच्या लढ्यासाठी अभाविपने विविध स्तरांवर प्रशासनाला निवेदने दिली आहेत: डविद्यापीठ स्तर:ङ नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू आणि सिनेट सदस्य (प्रथमेश फुलेकर, रोशनी केळकर, इ.) व व्यवस्थापन परिषद सदस्य (वामन तुर्के, अजय चाचरा).

तंत्रशिक्षण विभाग:ङ प्रादेशिक तंत्रशिक्षण संचालनालय (ञ्ऊ), नागपूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ प्रशासन.प्रशासकीय व राजकीय स्तर:ङ जिल्हाधिकारी (तहसीलदारांमार्फत) आणि मंत्री पंकज भोयर (भाजप जिल्हाध्यक्षांच्या माध्यमातून).

अभाविपची स्पष्ट भूमिका: अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आष्टी शाखा विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम कटिबद्ध आहे. आमदारांच्या शब्दाचा मान राखून आंदोलन थांबवले असले तरी, हा लढा संपलेला नाही. १० दिवसांत न्याय न मिळाल्यास होणाऱ्या तीव्र आंदोलनाला सर्वस्वी प्रशासन आणि महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार असेल. रिया लांबट अभाविप आर्वी जिल्हा संयोजक.